शुक्रवार, ११ नोव्हेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -९२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 11 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-92 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

### महत्वाची बातमी

## मुलगी देणार लालूप्रसाद यादव यांना किडनी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** बऱ्याच दिवसांपासून आजारी असलेले ष्ट्रीय जनता दलाचे संस्थापक लालूप्रसाद यादव यांच्याबद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे. लालूप्रसाद यादव यांना त्यांची मुलीने स्वतःची किडनी देण्याचा निर्णय घेतला आहे. लालूप्रसाद यादव आणि राबडी देवी यांची दुसरी मुलगी रोहिणी आचार्य जी सिंगापूरमध्ये असते, तिच्या किडनीमुळे लालूप्रसाद यादव यांना नवीन आयुष्य मिळणार आहे. एकाचवेळी अनेक आजारांशी लढत असलेले लालूप्रसाद यादव यांच्यावर किडनी प्रत्यारोपण प्रक्रिया सिंगापूरमध्ये होणार आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा की सिंगापूरमधील डॉक्टारांनी मान्यता दिली असून, किडनी प्रत्यारोपणाची सर्व तयारीही करण्यात आली आहे. सिंगापुरमध्ये राहूनही रोहिणी आचार्य कायम आपल्या कुटुंबाच्या संपर्कात असते, एवढच नाहीतर सोशल मीडियाच्या माध्यमातून बिहारच्या राजकारणावर टिप्पणी करत असते. अनेकदा स्वतःच्या कुटंबातील सदस्यांवर होणाऱ्या टीकांना तिने प्रत्युत्तरही दिले आहे. वडिलांची प्रकृती खालावल्यानंतर तिने आपल्या कुटुंबाला त्यांच्यावर सिंगापुरमध्ये उपचार करण्याचा आग्रह केला होता. एवढच नाहीतर तिने स्वतः किडनी सेंटरमध्ये जाऊन उपचारासंबंधी चर्चा केली आणि लालूप्रसाद यांच्यावरील उपचाराचा पुढील मार्गही सुकर केला.

# शिवरायांची जगदंबा तलवार परत आणणार

## सुधीर मुनगंटीवार : शिवराज्याभिषेकाला 2024 मध्ये 350 वर्षे पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवाजी महाराजांची जगदंबा तलवार ही ब्रिटनमधून परत आणण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. केंद्र सरकारमार्फत ब्रिटन सरकारकडे यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे सांगत ही तलवार 2024 पर्यत महाराष्ट्रात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले. जगदंब तलवार ही छत्रपती शिवाजी महाराज यांची पुजेची तलवार असल्याची माहिती इतिहासात नोंद आहे.**

सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, जगदंबा तलवार महाराष्ट्रात परत यावी यासाठी केंद्र सरकारकडे आम्ही पाठपुरावा करत आहोत. ऋषी सुनक ब्रिटनचे पंतप्रधान झाल्यानंतर आता केंद्र सरकारच्या माध्यमातून जगदंब तलवार परत आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. शिवराज्याभिषेकाला 2024 मध्ये 350 वर्षे पूर्ण होतील. त्यासाठी राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून आम्ही एक आराखडा तयार करत असून यावेळी जर जगदंबा तलवार भारतात परत आली तर आमचा आनंद द्विगुणित होईल. आज शिवप्रताप दिन साजरा केला जात असताना प्रतापगडावरील अफजलखानच्या कबरीजवळील अनधिकृत बांधकाम हटवले गेले. त्याचवेळी आज आणखी एक महत्त्वाची बातमी राज्य सरकारच्या वतीने देण्यात आली. साधारणपणे 1875 ते 1876 च्या दरम्यान ही तलवार महाराष्ट्रातून ब्रिटनला गेली. त्यावेळचे प्रिन्स भारत दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांना काही भेटवस्तू देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये जगदंबा तलवारीची समावेश होता. शिवरायांच्या पराक्रमाची साक्षीदार असलेली ही जगदंबा तलवार जर महाराष्ट्रात परत आली तर ती आनंदाची बातमी असणार आहे. इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत जगदंबा तलवारीसंबंधी माहिती देताना म्हणाले की,



करवीर छत्रपतींच्याकडे शिवरायांच्या वापरातील एक तलवार होती. तिची नोंद कोल्हापूरच्या शस्त्रागारामध्ये जगदंबा अशी करण्यात आली होती. करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज, जे त्यावेळी 11 वर्षांचे होते, त्यावेळी म्हणजे 1875 साली ब्रिटिश प्रिन्स ऑफ वेल्स भारत दौऱ्यावर आला होता. त्यावेळी तो भारतातील अनेक शस्त्रे घेऊन गेला. करवीर छत्रपतींकडून त्याने ही तलवार जबरदस्तीने भेट म्हणून घेतली होती. ही तलवार छत्रपती शिवरायांच्या वापरातील असल्याचे ब्रिटिशांच्या कॅटलॉगमध्ये नोंद आहे. ही तलवार परत आणावी यासाठी 19 व्या दशकामध्ये अनेकांनी प्रयत्न केले होते. आता ही तलवार परत आणल्यास आम्हा इतिहास प्रेमींना आनंदच होईल.



भारत जोडो यात्रेला कापशी फाटा ते नांदेड दरम्यान गुरुवारी तुफान प्रतिसाद मिळाला. एका वयोवृद्ध आजीने राहुल गांधी यांचे औक्षण केले.

# बुलेट ट्रेन प्रकल्प : राज्य सरकारची जमीन संपादनाची प्रकिया बेकायदा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी राज्य सरकारने सुरू केलेली भूसंपादन प्रक्रिया बेकायदा असल्याचा आरोप गोदरेज अॅण्ड बॉईस कंपनीने गुरुवारी उच्च न्यायालयात केला. प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेला कंपनीने केलेला विरोध, संपादन प्रक्रियेत निर्माण केलेले अनावश्यक अडथळे यामुळे हा प्रकल्प रखडल्याबाबत राज्य सरकारने केलेल्या आरोपाचे कंपनीने खंडन केले. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्याच्या राज्याच्या आदेशाला कंपनीने आव्हान दिले आहे. या याचिकेला विरोध करणारे प्रतिज्ञापत्र राज्य सरकारतर्फे वकील ज्योती चव्हाण यांनी दाखल केले होते. त्यात भूसंपादन प्रक्रियेस विलंब होण्यात कंपनीचा मोठा वाटा होता, असा दावा राज्य सरकारने केला होता. सरकारच्या आरोपांचे खंडन करणारे प्रतिज्ञापत्र कंपनीने गुरुवारी न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपोठसमोर झालेल्या सुनावणीच्या दाखल केले. न्यायालयाने कंपनीच्या प्रतिज्ञापत्राची नोंद घेऊन प्रकरणाची सुनावणी २१ नोव्हेंबर रोजी ठेवली. दरम्यान, प्रकल्पासाठी सरकारने सुरू केलेली भूसंपादन प्रक्रिया 'बेकायदेशीर' असून त्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचा दावा कंपनीने प्रतिज्ञापत्राद्वारे केला आहे. सरकारने निश्चित केलेली भरपाईही चुकीची आहे. त्यामुळे त्याबाबतचा निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी कंपनीने केली आहे. प्रकल्पासाठी झालेला विलंब हा आपल्याकडून नाही, तर राज्य सरकार आणि हा प्रकल्प राबवणाऱ्या नॅशनल हाय स्पीड कॉर्पोरेशनमुळे झाल्याचा दावाही कंपनीने केला आहे. भरपाई कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्यात सरकार अपयशी ठरल्याचा दावाही कंपनीने केला आहे. भूसंपादनाच्या अंदाजे खर्चाचा तपशील देणारा कोणताही अहवाल तयार करण्यात आला नव्हता आणि त्यामुळे संपूर्ण निर्णय प्रक्रिया कायद्यानुसार नाही. आपल्याला देऊ केलेली २६४ कोटी रुपयांची अंतिम नुकसान भरपाईची रक्कम ही जमीन संपादनासाठी कंपनीला देऊ केलेल्या सुरुवातीच्या ५७२ कोटी रुपयांचा एक अंश आहे, असा दावाही कंपनीने केला आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी संपादित केलेल्या १० हेक्टर जमिनीकरिता २६४ कोटी रुपये नुकसानभरपाई निश्चित करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यात बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे होणाऱ्या सामाजिक बदलांचा तज्ज्ञांकडून अभ्यास करण्यात आलेला नाही, असा आक्षेप कंपनीने घेतला आहे. ही अट दूर सारण्यासाठी कायद्यात दुरूस्ती करण्यात आल्याचा दावाही कंपनीने केला आहे. सरकारचा दावा सामाजिक बदलांचा अभ्यास करण्याच्या अटीचा गैरफायदा घेऊ नये यासाठी खबरदारी म्हणून भूसंपादन कायद्यात दुरूस्ती करण्यात आली, असे सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले होते.

# कनेक्टिव्हिटी, डिजिटल मीडिया बनतेय मूलभूत गरज

## जवाहर सरकार यांचे प्रतिपादन; एमआयटी डब्ल्यूपीयूतर्फे चौथ्या राष्ट्रीय माध्यम व पत्रकारिता परिषदेचे उद्घाटन


आधुनिक केसरी न्यूज

पुणे : अन्न, वस्त्र, निवारा आणि कनेक्टिव्हीटी या आजच्या काळातील मूलभूत गरजा आहेत. डिजिटल मीडिया आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. याच गोष्टीचा लाभ घेण्यासाठी माध्यमे, राजकारण आणि उद्योग यांचे विलीनीकरण होताना दिसतेय. माध्यमांचा उपयोग करून आपले स्थान मजबूत करण्यावर राजकारण्यांकडून भर दिला जात आहे," असे प्रतिपादन राज्यसभा खासदार आणि प्रसारभारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी जवाहर सरकार यांनी केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कुल ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशनच्या वतीने आर. के. लक्ष्मण म्युझियम, मुंबई प्रेस क्लब, द फॉरेन करस्पॉडंट क्लब आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सहयोगाने विश्वराज बाग, लोणी काळभोर येथील विश्वशांती सभागृहात आयोजित तीन दिवसीय चौथ्या राष्ट्रीय माध्यम व पत्रकारिता परिषदेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी एशियन न्यूज इंटरनॅशनलच्या संपादिका स्मिता प्रकाश, ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक राशीद किडवई, आर. के. लक्ष्मण म्युझियमच्या संचालिका उषा लक्ष्मण, एमआयटी वर्ल्ड पीसी युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. राहुल विश्वनाथ कराड, प्र-कुलगुरू डॉ. रवीकुमार चिटणीस, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष स्वप्नील बापट, स्कुल ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशनचे संचालक धीरज सिंह, दूरदर्शनचे माजी महासंचालक मुकेश शर्मा, विद्यार्थी प्रतिनिधी इर्तिका एजाज, तेजस कोल्हटकर आदी उपस्थित होते. एनडी टीव्हीचे वरिष्ठ संपादक सुशीलकुमार




महापात्रा, मुक्त पत्रकार रवलीन कौर व मुक्त पत्रकार नीतू सिंग यांना पहिला 'जर्नालिझम फॉर पीस' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सरकार म्हणाले, "कोविड काळात ओटीटी, मोबाईल जर्नालिझमने आपले स्थान प्रस्थापित केले आहे. त्यामुळे वृत्तपत्रे, वाहिन्या यांसह सोशल मीडिया, डिजिटल मीडिया या नवमाध्यमांचा प्रभाव मोठा आहे. निर्भया प्रकरण, अण्णा हजारे यांचे आंदोलन, नरेंद्र मोदी यांचे लॉन्चिंग यामध्ये या नवमाध्यमांचा फार प्रभावी उपयोग केला गेला. फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप द्वारे परिवर्तनाच्या मोहीमा राबवल्या गेल्या. आज ही माध्यमे आपल्या प्रत्येकाच्या हाती आल्याने प्रत्येकाला आवाज उठवण्याची संधी मिळाली आहे." स्मिता प्रकाश म्हणाल्या, "माध्यमांचे विविध पर्याय उपलब्ध झाल्याने सामान्य नागरिकही आवाज उठवू शकतो. सोशल मीडियाचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येकाच्या हाती नवी माध्यमे आल्याने स्वतःकडे लक्ष खेचून घेण्याची स्पर्धा लागली आहे. त्यातून गोंधळाचे वातावरण, चीड आणि नकारात्मता तयार होत आहे. मात्र, अशा गोंधळ घालणाऱ्यांपासून सावध राहत नैतिकता आणि तत्वनिष्ठता जपायला हवी. भारतातील माध्यम उद्योग व्यापक आहे. येथे २३ पेक्षा अधिक भाषेत वृत्तपत्रे निघतात. ९०० पेक्षा अधिक सॅटेलाईट चॅनेल्स असून, हजारो डिजिटल चॅनेल्स व पोर्टल्स यामुळे वेगवेगळ्या संधी मोठ्या प्रमाणात आहेत. रशीद किडवई म्हणाले, "कालानुरूप माध्यमे बदलली, तशी आव्हानेही बदलली. या आव्हानांना समजून घेत समाजहिताची पत्रकारिता करण्यावर आपण भर द्यावा. सदोष निवडणूक प्रक्रियेमुळे माध्यमांचा गैरवापर, भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात होतो. पत्रकारांना थेट महत्वाच्या व्यक्तींपर्यंत पोहोचता येते, या भावनेतून अनेक राजकारणी, उद्योजक माध्यमे हाताशी धरतात किंवा माध्यम संस्था सुरु करतात. प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी उपस्थितांना ऑनलाईन स्वरूपात मार्गदर्शन केले. स्वप्नील बापट, मुकेश शर्मा यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. रवीकुमार चिटणीस यांनी 'एमआयटी' मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची विस्तृत माहिती दिली. धीरज सिंग यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गुरुप्रसाद राव यांनी आभार मानले.

# सेवाव्रती




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

साधी सिरिंज देखील लवकर मिळायची नाही. एक्स रे मशीन, इन्क्युबेटर या सारख्या गोष्टी तर दुरापास्त होत्या. ऑपरेशनच्या वेळी भूल देण्यासाठी भूलतज्ज्ञ नव्हता. या अनंत अडचणींचा सामना हे दांपत्य करीत गेले. त्यातून नवनवीन गोष्टी शिकत गेले. अनुभव समृद्ध होत राहिले.
डॉ कुलकर्णी यांचे कार्य पाहिल्यावर मला डॉ प्रकाश बाबा आमटे यांची प्रकर्षाने आठवण झाली. त्याचबरोबर डॉ अभय बंग आणि डॉ राणी बंग यांचेही कार्य आठवले. या सगळ्यांचे कार्य समांतर असेच आहे. आदिवासी, अशिक्षित रुग्ण, दुर्गम भागातील अडचणी, सोयी सुविधांचा अभाव या सगळ्यांवर मात करून त्यांनी आपले कार्य पुढे चालूच ठेवले. इतरांपुढे एक आदर्श निर्माण केला. डॉ कुलकर्णी यांनी तर ज्यावेळी वीज उपलब्ध नसायची अशा वेळी कंदिलाच्या प्रकाशात सुद्धा ऑपरेशन केले. पण गुणवत्ता आणि साधन शुचिता यांच्याशी कुठेही तडजोड केली नाही.
विविध क्षेत्रातील योगदान देणाऱ्या



व्यक्तींसाठी नोबेल पारितोषिके गेल्या महिन्यात नुकतीच जाहीर झाली. गेल्या शंभर वर्षात लागलेले कोणते शोध तुमच्या दृष्टीने महत्वाचे आहेत यावर जवळपास एक हजार नोबेल पारितोषिक विजेत्यांची मते घेण्यात आली. त्या सर्वांच्या मते गेल्या शंभर वर्षात लागलेले दोन शोध मानव जातीच्या दृष्टीने सर्वात जास्त उपयोगाचे आहेत. त्यातील पहिला शोध म्हणजे ओ आर एस पावडर. ( ओरल रिहायड्रेशन सॉल्ट ) या शोधाने शरीरात पाणी कमी झालेल्या लाखो रुग्णांचे जीव जगभर वाचले. थोडक्यात म्हणजे जलसंजीवनी. मीठ, साखर पाणी यांचे मिश्रण. हा वरवर साधाच वाटणारा पण अत्यंत महत्वाचा क्रांतिकारी शोध. आणि दुसरा शोध म्हणजे माणूस हा माणसाची वर्तनशैली बदलू शकतो. तसं तर वर्तनशैली बदलणं हे कठीण काम. पण जर समजून सांगता आलं तर ते शक्य होतं. उदाहरणार्थ मधुमेहाचे किंवा हृदयरोगाचे रुग्ण असतील तर त्यांना आहार, व्यायाम इ च महत्व सांगून त्यांच्या वर्तनशैलीत बदल करायला लावता येऊ शकतो. या दोन्ही गोष्टी डॉ कुलकर्णी यांनी अमलात आणल्या.
**(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## निरंतर आनंद पैशाने विकत घेता येत नाही

आधुनिक केसरी

कालचा दिवस संपला, तरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच पण शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. हल्ली जगात पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायाने निराश होतो.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

"आजचा दिवस माझा" हेच सत्य आहे आणि म्हणूनच ते सिद्धही केले पाहिजे. आपल्याला आपण स्वतः प्रसिद्ध होण्याची इर्षा असते आणि ती असलीच पाहिजे पण प्रसिद्ध होण्यासाठी अगोदर स्वतःला सिद्ध करण्याची जरुरी असते हे मात्र आपण विसरतो. केवळ विचारांत, स्वप्नांत, भ्रमांत आणि संभ्रमांत न अडकून पडता कार्यकक्षांच्या मर्यादा ओलांडाव्या लागतात, स्वतःला झोकून देऊन प्रत्यक्ष कार्यकृती करावी लागते, हे मनात आले पाहिजे, आपण ध्यानांत घेतले पाहिजे.
चांगले-वाईट, चूक-बरोबर, खरे-खोटे अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दुःख आणि निराशा पदरी येते. मग आपण दोष मात्र आपल्या नशिबाला नाहीतर परमेश्वरालाच देत राहतो. अनेकदा नकारात्मक विचारच आपले नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानाने आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचे अनुभवायला येऊ लागते.



आधुनिक केसरी

## स्वार्थाचा सन्मान | करू नये ||

सारासार शुद्ध | करावा विचार ||
उगा व्याभिचार | करू नये ||१||

देहाचे चोचले | विनाशा कारण ||
आयुष्य तारण | ठेऊ नये ||२||

संगतिचे भान | ठेवा निरंतर ||
नामात अंतर | राहू नये ||३||

व्यासंगाशी संग | करावा सदैव ||
आणिकाशी भाव | देऊ नये ||४||

आपुल्या हीताचा | राखा स्वाभिमान ||
स्वार्थाचा सन्मान | करू नये ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"


आधुनिक केसरी

## विनवणी

आई तुझ्या दारी आलो। न करी उदास।
पायी तुझ्या देई जागा। करीन आरास।
तुझ्याविण नाही त्राता। लावलीसे आस।
विश्वात्मिके पाही मला। म्हणे चंद्रहास।।


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## मंगलाचरण

आधुनिक केसरी

समर्थाच्या मते असे वाईट कर्म कोणीही करू नये।
50 व्या ओवीत एक श्लोक सांगितला आहे त्याचे थोडक्यात विवेचन करून आपण प्रथम समासाचा समारोप करूरा. व्यावसायात्मिका बुध्दिरेकेन।बहूशाखा हद्दनंताश्च बुद्वयो-व्यावसायिनाम.।
अर्जुना,स्वरूपनिश्चय करणारी बुध्दी एकच असते.ज्यांना स्वरूपनिश्चय करता येत नाही अशा लोकांच्या बुध्दीला खुप फाटे फुटलेले असतात. ज्यांचा मनावर ताबा नाही जो कुठलाही निश्चय करू शकत नाही, ज्याचे चित्त सतत अस्थिर असते. अशा माणसांना आत्मस्वरूपाचे विवेचन काय समजणार.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आणि ते कळण्यासाठी मनाची अतिशय सावधानता लागते.चित्त एकाच विषयाकडे लागण्याची शक्ति लागते. सर्व समावेशक, समाधान असणारे मन असावे लागते.समाधान, सदाचार,सद्विचारांची गाठोडी घेऊन जीवननौका पार करणे म्हणजेच अध्यात्म होय. समर्थ आपल्याला अध्यात्म म्हणजे काय ते सांगून माया कशी आहे याचे थोडक्यात वर्णन करतात.
माया कशी व ब्रम्ह कसे हे ओळखणे म्हणजे "अध्यात्म"होय.पण ते समजण्यासाठी माया कशी आहे ते तिचे स्वरूप आधी समजावून घेतले पाहिजे. **(क्रमशः)**

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**मना वासना वासुदेवी वसों दे।**
**मना कामना कामसंगी नसों दे।**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे।**
**मना सज्जना सज्जनी वस्ति कीजे।।१२८।।**

सरळ अर्थ : हे मना, तुझी वासना केवळ वासुदेवाच्या ठायी वसू दे, कामेच्छेत नको, भलत्या सलत्या कल्पना तुझ्यामध्ये निर्माण होऊ देऊ नकोस आणि सज्जनांच्या सहवासातच तू रममाण हो.
विवेचन : मागील श्लोकात समर्थांनी धन्य पुरुषाच्या सर्व मनोवासना रामरुपात बुडून गेलेल्या, पर्यायाने, नष्ट झालेल्या असतात असे म्हटले असले तरी संपूर्ण कामना, वासना, नष्ट होणे शक्य नसते. तसे असणे नैसर्गिक प्रवृत्तीच्या विरुध्द असते हे तेहि जाणून आहेत. त्यामुळे स्वाभाविक परंतु योग्य असलेल्या इच्छा, मनोकामना या असाव्यात. पण त्यांना एक निश्चित दिशा दिलेली असावी, असे समर्थ आपल्याला या श्लोकात सांगत आहेत. समर्थ राम, कृष्ण, शिव यात भेद मानीत नाहीत. म्हणून ते इथे म्हणतात वासना वासुदेवी वसु दे.
धन्य झालेला जीव देखील मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा करणारा असू शकतो. मोक्ष या दिशेकडे त्याची कामना असते. सर्वसामान्य माणसाला हरीकृपेची कामना असावी. म्हणून समर्थ म्हणतात, हे मना तू आपल्यात केवळ वासुदेवाच्या, भगवंताच्या भक्तीची कामना वसू दे. विषयासक्तीची, दैहिक सुखाची, कामवासनेची इच्छा ठेवू नको. या वासनेसारख्या आणखी भलभलत्या इच्छा असू शकतात. त्यादेखील तू आपल्यामध्ये बाळगू नको. राग, द्वेष, मत्सर, यापोटी निर्माण होणाऱ्या इच्छा, कामना अशाच वावग्या म्हणजे न



जोपासण्यासारख्या असतात. त्या तू आपल्या ठायी निर्माण होऊ देवू नकोस. तसेच हे साध्य करण्यासाठी तू कुसंगती टाळ. सन्मार्गी, सज्जन व्यक्तीच्या सहवासात रहा. अशा सहवासात असताना मनात कुविचार येत नाहीत.
"सुसंगती सदा घड़ो, सुजन वाक्य कानी पडो......." हे सुभाषित आपल्या सर्वांचे पाठ असेल. संगतीचा परिणाम काय असू शकतो किंवा होऊ शकतो, हे आपण सर्व जाणता. कोळशाच्या खाणीत गेले की अंगाला काळा रंग लागणे स्वाभाविक आहे, तद्वतच दुसऱ्याच्या अत्तर लावले की त्यातील कणभर आपल्या हाताला लागते, आपला हात सुगंधी होतो. संगती सज्जनांची असावी, हे यासाठीच. पण समजा, आपण देवळात गेलो, मंदिर उत्तम आहे, तेथील वातावरण निव्वळ पवित्र आहे, पण आपले लक्ष जर मंदिराच्या बाहेर काढून ठेवलेल्या चप्पलांकडे राहिले तर...? किंवा एखादा मनुष्य मंदिरात गर्दीचा फायदा घेऊन चोरी करण्याच्या हेतुनीच आला असेल तर...?. कोणालाच संगतीचा फायदा होणार नाही, कारण संगती उत्तम आहे, पण वासना शुद्ध नाही, हेतू शुद्ध नाही...
आजचा काळ वेगळा आहे. सध्या संत नाहीत असे नाही, परंतु मनुष्याचा मनोव्यापार बदलत आहे. साक्षात पांडुरंग समोर उभा ठाकला तरी लोक त्याला आधी तुझे आधार कार्ड दाखव असा प्रश्न विचारतील, अशी सध्याची परिस्थिती आहे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

संतांची भेट होणे मुश्किल, झालीच तर त्यांची पारख होणे मुश्किल, म्हणून संतांनी लिहिलेल्या ग्रंथाचा संग धरावा. आता ग्रंथ कशाला म्हणावे असा प्रश्न पडणे स्वभाविक आहे. त्याचे उत्तर ही संतांनी देऊन ठेवले आहे.
समर्थ दासबोधात तील दशक ७ समास ९ मध्ये म्हणतात,
*"इतर जे प्रापंचिक । हास्य विनोद नवरसिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥ २९ ॥ जेणें परमार्थ वाढे । अंगीं अनुताप चढे । भक्तिसाधन आवडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३० ॥"* (इतर जे प्रापंचिक ग्रंथ आहेत, ज्यात हास्यविनोद वगैरे आहेत, तसेच रुंगासदी नवरसांनी जे परिपूर्ण आहेत ते ग्रंथ परमार्थी माणसाला हितकारक नाहीत.
ज्या ग्रंथांच्या योगे परमार्थात वाढ होते, अंतःकरणात पश्चात्ताप होतो व भगवंताची भक्ती करण्याची आवड उत्पन्न होते, त्याला ग्रंथ म्हणावे.)
ते पुढे म्हणतात, *"जो ऐकतांच गर्व गळे । कां ते भ्रांतीच मावळे । नातरी एकसरी वोळे । मन भगवंतीं ॥ ३१ ॥"* (जो ग्रंथ श्रवण करताच देहाभिमान नष्ट होतो, अज्ञान व विपरीत ज्ञानरूपी भ्रांती नष्ट होते अथवा मन एकाएकी भगवंताकडे ओढ घेऊ लागते.)
तर संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात,
"संत चरण रज लागता सहज, वासनेचे बिज जळूनी जाय । मग रामनाम उपजे आवडी, सुख घडोघडी वाढु लागे । कंठी प्रेम दाटे नयनी नीट लोटे । हृदयी प्रगटे रामनाम हृदयी प्रगटे रामनाम । तुका म्हणे साधन सुलभ गोगटे परी उपतिष्ठे रामनाम ॥"
मनाचे काम सतत विचार करणे हेच आहे. ते स्थिर बसत नाही. ते सतत नवनवीन विचार पेरीत रहाते. आपण त्याच्या पाठीमागे जाऊ नये. 'सुरुचि'चे ऐकू नये, 'सुनीति'चे ऐकावे आणि कृती करावी. आपण कार्य करतो, तेथील वातावरण कदाचित शुद्ध नसेल, परंतु आपले मन आपल्या ताब्यात ठेवले पाहिजे, मनात कोणताही विकल्प येऊ देऊ नये, म्हणजे बसल्या जागी आपल्या सत्संगाचा लाभ होईल. "मनाचा महादेव" अशी एक म्हण आहे. या सर्वा साठी एकमेव उपाय अखंडीत अनुसंधान, सद्ग्रंथांचे वाचन ( गीता, तुकारामांचा गाथा, दासबोध, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी इ. ) नित्य नामस्मरण किंवा प्रत्येक गोष्ट आपल्या सदगुरुंना सांगून करणे, अर्थात संपूर्ण शरणागती.

## 'ज्योतिर्मय'




आधुनिक केसरीच्या 'ज्योतिर्मय' दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, ज्येष्ठ पत्रकार सुधीर जगदाळे, विलास इंगळे, रवी गाडेकर, श्रीराम नरसीकर, मुख्य संपादक डॉ. प्रभू गोरे.

# आम्ही नौटंकी करत नाही : प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांच्याविषयी कोणी काही बोलले तर तो महाराष्ट्राचा अपमान ठरतो. पण इतर महिलांचा अपमान झाल्यावर कोणी काही बोलत नाही. मग या महिला रस्त्यावर पडल्यात का, असा संतप्त सवाल भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी विचारला. त्या गुरुवारी अमरावती येथील पत्रकार परिषदेत बोलत होत्या. आम्ही नौटंकी करत नाही. आम्हालाही वाट्टेल ते बोलले जाते, पण कोणावरही कारवाई होत नाही. स्वप्ना पाटकर या कोणत्याही राजकीय पक्षाच्या नव्हत्या. त्यांच्यासोबत काय झालं? त्यांनी किती घाणेरड्या शिव्या देण्यात आल्या. तेव्हा कोणी म्हटले का, महाराष्ट्राचा अपमान झाला. कंगना रनौत हिचे घर पाडण्यात आले. त्यानंतर 'उखाड के फेक दिया' असे म्हटले गेले. तेव्हादेखील काय झाले. केतकी चितळेला एक महिना जेलमध्ये टाकले होते. तिच्या आईबापाला जाऊन भेटा, बघा त्यांची अवस्था काय झाली आहे? त्यांची काय चूक होती. मी या सगळ्या महिलांना जाऊन भेटले आहे. यावर पत्रकारांनी तुम्ही केतकी चितळे हिच्या पोस्टचं समर्थन करता का, असे चित्रा वाघ यांना विचारले. तेव्हा चित्रा वाघ यांनी जोरदार प्रतिवाद करताना म्हटले की, ती पोस्ट केतकी चितळेने लिहली होती का? तुम्ही या तांत्रिक बाबी तपासत जा. तुमच्या घरातील एखाद्या व्यक्तीला फेसबुक पोस्टमुळे जेलमध्ये टाकलं, तर तुमची भूमिका काय असेल? आपल्याकडे व्यक्तीस्वातंत्र्य आहे की नाही, असे सवाल वाघ यांनी उपस्थित केले.

# तिकिटापेक्षा चौकशी खिडकीमोर गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रेल्वे स्टेशनवर चौकशीसाठी एकच खिडकी उघडी असल्यामुळे बुधवारी तिकिटाच्या खिडकीपेक्षा चौकशी खिडकीमोर मोठी गर्दी असल्याचे दिसून आले. चौकशीसाठी खिडकीजवळ येण्यासाठी प्रवाशांना सात ते दहा मिनिटे रांगेत उभे राहावे लागत होते. पुणे रेल्वे स्टेशनवरील तिकीटघराची बुधवारी सायंकाळी पाहणी केली असता तेथे मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याचे दिसून आले. तिकीट खिडकी, एटीव्हीएम मशिन येथेही प्रवाशांनी गर्दी केली होती. काही प्रवासी 'एटीव्हीएम'वर स्कॅनरच्या मदतीने तिकीट काढत होते. चौकशीसाठी दहा ते पंधरा जण रांगेत उभे होते.

# 'भारत जोडो यात्रा' गंगा नदीसारखी मुख्य धारा

## ईडी मोदी सरकारच्या हातचे हत्यार : जयराम रमेश

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** 'भारत जोडो यात्रा' कन्याकुमारी ते काश्मीर असा प्रवास करत आहे. या मार्गाबद्दलही काही शंका व्यक्त केल्या जात आहेत पण देशाची दोन ध्रुव जोडणारा हा मार्ग आहे. ही पदयात्रा गंगा नदीसारखी मुख्य यात्रा असून उपनद्यांप्रमाणे ओडीशा, त्रिपुरा राज्यात पदयात्रा सुरु आहेत. पश्चिम बंगाल व इतर राज्यातही अशाच पद्धतीने 'भारत जोडो यात्रा' निघत आहेत, असे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे प्रमुख जयराम रमेश यांनी स्पष्ट केले आहे. पत्रकारांशी संवाद साधताना जयराम रमेश म्हणाले की, भारत जोडो यात्रा गुजरात, हिमाचल प्रदेश या निवडणुकीच्या राज्यातून जात नाही. महाराष्ट्रातही फक्त पाचच जिल्ह्यातून पदयात्रा जात आहे, इतर राज्यात तसेच भागात ही पदयात्रा का जात नाही? असे प्रश्न विचारले जात आहेत. पण कन्याकुमारी ते काश्मीर ही भारताची उत्तर-दक्षिण दोन धृव याने जोडले जात आहेत. निवडणुकीचे वेळापत्रक व पदयात्रेचे वेळापत्रक यांचा ताळमेळ लागणेही अशक्य आहे. निवडणुक काळात पदयात्रा गुजरात किंवा हिमाचल प्रदेशात गेली तर सर्व संघटना पदयात्रेतच व्यस्त राहिली असती. पदयात्रेचा मार्ग विविध



क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करुन आखला गेलेला आहे, सुरक्षेसंदर्भातही काही प्रश्नांचा विचार करुन हा मार्ग निवडलेला आहे. केंद्र सरकार ईडी, सीबीआयसारख्या तपास यंत्रणांचा गैरवापर केवळ विरोधी पक्षातील लोकांवर दहशत निर्माण करण्यासाठी, त्यांचा छळ करण्यासाठी केला जात आहे. केंद्रातील भाजपा सरकारच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या अनेकांना त्याचा त्रास सहन करावा लागला आहे. शिवसेना खासदार संजय राऊत यांनीही त्याचीच किंमत मोजली आहे. सोनियाजी गांधी, राहुलजी गांधी यांनाही चौकशीच्या नावाखाली नाहक त्रास दिला गेला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्यावर याच पद्धतीने दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला. विरोधी पक्षांनी वारंवार केंद्रीय यंत्रणांचा राजकीय स्वार्थासाठी गैरवापर केला जात असल्याबद्दल आवाज उठवला आहे. संजय राऊत यांना जामीन मंजूर करताना पीएमएलए कोर्टाने ईडीच्या कार्यपद्धतीवर गंभीर ताशेरे ओढले आहेत. 'मोदी सरकार के दो भाई, ईडी और सीबीआय', असा टोलाही जयराम रमेश यांनी लगावला. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राच्या माध्यमातून विकासाची कामे झालेली आहेत. या क्षेत्रावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचा दबादबा आहे. हा दबदबा मोडून काढण्यासाठीच भारतीय जनता पक्षाने केंद्रात सहकार खाते निर्माण करून गृहमंत्र्यांकडेच त्याचा कारभार सोपवला आहे. सहकार क्षेत्र मोडीत काढण्यासाठीच हे केले गेले आहे. डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या काळात सहकार क्षेत्रावर कर लावला जात नव्हता परंतु मोदी सरकारने सहकारावरही कर लावला आहे. साखर निर्यातीची मर्यादाही कमी केली आहे. हे सर्व सहकार क्षेत्र संपवण्यासाठी चालले आहे, असेही जयराम रमेश म्हणाले.


कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे

जालना शहरात

भाषणकलेची कार्यशाळा

दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण

✻ व्हाट्सप संपर्क ✻

विनोद जैतमहाल

9823028332

SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016


# केंद्रीय यंत्रणा केंद्र सरकारच्या पाळीव प्राण्यांप्रमाणे वागते

## उद्धव ठाकरेंची केंद्रीय तपास यंत्रणांवर जोरदार टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पत्राचाळ घोटाळ्या प्रकरणी खासदार संजय राऊत यांना काल जामीन मिळाल्यानंतर आज ते माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी 'मातोश्री' या उद्धव ठाकरेंच्या निवासस्थानी पोहोचले होते. यावेळी संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. दरम्यान, यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी केंद्रीय तपास यंत्रणांवर जोरदार टीका केली. केंद्रीय यंत्रणा केंद्र सरकारच्या पाळीव प्राण्यांप्रमाणे वागत असल्याचे ते म्हणाले. संजय राऊत हे शिवसेनेचे नेते आहेत. तसेच खासदार, सामनाचे कार्यकारी संपादक आणि माझे मित्रही आहेत. त्यांची जामीनावर सुटका झाली त्यांचा मला आनंद झाला आहे. मात्र, काल न्यायदेवतेने जो निर्णय दिला आहे, मी न्यायालयचे आभार मानतो. या निकालपत्रात न्यायालयाने परखड आणि अत्यंत



स्पष्टपणे काही निरीक्षणे नोंदवलेली आहेत. त्यामुळे आता हे जगजाहीर झाले आहे की, केंद्रीय यंत्रणा केंद्र सरकारच्या पाळीव प्राण्यांप्रमाणे वागतात आहेत. ज्यांच्या अंगावर जा म्हटले त्यांच्या अंगावर जातात. बेकायदेशीरपणे वागत असल्याचे संपूर्ण देशाने, जगाने बघितले आहे, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही न्यायदेवता आपल्या ताब्यात घेतात की काय अशी वक्तव्य केंद्रीय मंत्री किरण रिजीजू यांची आहेत. त्यांनी न्यायदेवतेवर शंका उपस्थित केली आहे. एकूणच सर्व सामान्यांच्या आशेचा किरण हे न्यायालये असतात आणि न्यायलय जर आपल्या बुडाखाली घेण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत असेल, तर देशातल्या तमाम जनतेने त्याचा विरोध पाहिजे, असेही ते म्हणाले. न्यायदेवतेच महत्त्व तिच्यावर भाष्य करणं हा गुन्हा आहे आणि हा गुन्हा जर केंद्रीय कायदेमंत्रीच करत असतील तर त्यावर न्यायदेवता कारवाई करेल. मात्र एक गोष्ट निश्चित आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा उपयोग करून अनेक पक्ष फोडले गेले, तर काही पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला जातो आहे, असा आरोपही त्यांनी केला.




# लाजिरवाणा पराभव

आधुनिक केसरी

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या टी२० विश्वचषकात गुरुवारी) भारत आणि इंग्लंड यांच्या दरम्यान दुसरा उपांत्य फेरीचा सामना खेळला गेला. भारतीय संघाने सांघिक कामगिरीच्या जोरावर उभारलेल्या १६८ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडने आपल्या दोन्ही सलामीवीरांच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताचा तब्बल १० गडी राखून दारूण पराभव करत अंतिम फेरीत जागा निश्चित केली. यासह भारतीय संघाचे दुसऱ्यांदा टी२० विश्वविजेतेपदाचे स्वप्न अधुरे राहिले. जॉस बटलरला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. इंग्लंडच्या दोन्ही सलामीवीरांनी यावेळी भारताच्या गोलंदाजीवर प्रहार केला. त्यामुळेच भारताच्या हातून यावेळी सामना निसटला. ॲलेक्स हेल्स आणि जोस बटलर यांनी अर्धशतक झळकावली, त्याचबरोबर शतकी भागीदारी केली आणि इंग्लंडला विजय मिळवून दिला. या दोघांनी आपली विकेट न देता भारतावर दमदार विजय साकारल्याचे पाहायला मिळाले. फलंदाजांनी उभारलेल्या आव्हानात्मक धावसंख्येचा पाठलाग करताना इंग्लंडसाठी कर्णधार जोस बटलर व ॲलेक्स हेल्स यांनी सुरुवात केली. बटलरने पहिल्या षटकात तीन चौकार ठोकत आपले इरादे जाहीर केले. त्यानंतर दुसऱ्या बाजूने ॲलेक्स हेल्सने आक्रमण केले. दोघांनीदेखील भारतीय गोलंदाजांची पिसे काढत आपापली अर्धशतके पूर्ण केली. त्यांनी संयम व आक्रमण यांचा सुरेख मेळ साधत विजय इंग्लंडच्या बाजूने नेला. बटलरने नाबाद ८० तर हेल्सने ८६ धावा करत इंग्लंडला दहा गड्यांनी विजय मिळवून दिला. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी संधी मिळालेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. राहुल केवळ पाच धावा काढून माघारी परतला. कर्णधार रोहित जम बसल्यानंतर २७ तर सूर्यकुमार यादव १४ धावा करून बाद झाले. एका बाजूने शानदार पद्धतीने खेळत असलेल्या विराट कोहलीने अर्धशतक पूर्ण केले. मात्र, अर्धशतक पूर्ण करताच तो तंबूत परतला. त्यानंतर हार्दिक पंड्याने भारतीय डावाची सूत्रे आपल्या हाती घेतली. सुरुवातीला अंदाज घेतल्यानंतर त्याने अखेरच्या चार षटकात अक्षरशः इंग्लिश गोलंदाजांची धुलाई केली. अखेरच्या चेंडूवर बाद होण्यापूर्वी त्याने ४ चौकार व ५ षटकारांसह ३३ चेंडूवर ६३ धावा केल्या. त्याच्या या आक्रमक खेळीमुळे भारतीय संघ ६ बाद १६८ अशी मजल मारू शकला. एका बाजूने शानदार पद्धतीने खेळत असलेल्या विराट कोहलीने अर्धशतक पूर्ण केले. हे त्याचे स्पर्धेतील चौथे अर्धशतक ठरले. तसेच यादरम्यान त्याने आंतरराष्ट्रीय टी२० मध्ये ४००० धावांचा टप्पा पूर्ण केला. त्याने ५० धावांची खेळी केली. यामध्ये ४ चौकार व एका षटकाराचा समावेश होता. भारताचे फलंदाज एकामागून एक बाद होत होते, पण त्यावेळी संघाचा डाव सावरला तो कोहलीने. कारण यावेळी फक्त संघाला डाव सावरला नाही तर त्याने विश्वविक्रमही रचला. कोहलीने आता टी२० क्रिकेटमध्ये चार हजार धावांचा टप्पा पूर्ण केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कोहलीने हा विक्रम करत आपल्या नावाला एक वेगळे वलय निर्माण झाले आहे.

# अल्पवयीन मुलींची सौंदर्य स्पर्धा



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**केवळ सौंदर्य हे सर्व काही आहे अशा पद्धतीचा संदेश लहान वयात त्यांच्या मनावर बिंबविणे हे कितपत योग्य आहे? समाजातील सर्व स्तरातील लोकांनी याचा विचार करायला पाहिजे. येणाऱ्या काळामध्ये देशाची अर्धी लोकसंख्या असलेली स्त्री शक्ती ही देशाच्या विकासात, प्रगतीत महत्त्वाचा सहभाग देणार आहे. त्यामुळे त्यांच्याकडे एक कुशल मनुष्यबळ अशा पद्धतीने बघणे व त्यांना बनविणे हीच खरी आवश्यकता आहे असे वाटते.**

मिस इंडिया, मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स अशा पद्धतीच्या सौंदर्य स्पर्धांची नावे आपल्याला माहीत असतीलच. पश्चिमात्य राष्ट्रांकडून ही संकल्पना आपल्याही देशात पोहोचलेली आहे. त्यामुळे विविध शहरांमध्ये अशा पद्धतीच्या सौंदर्य स्पर्धांचे आयोजन देशभर होत असते. मिस नंतर आता मिसेस साठी सुद्धा अशा पद्धतीच्या स्पर्धा होऊ लागलेल्या आहेत. नुकतीच एक अल्पवयीन मुलीं करता ही सौंदर्य स्पर्धा आयोजित झाल्याचे समजले. त्यामुळे काही विचार निश्चितच अशा स्पर्धांकडे पाहून उत्पन्न होतात व काही प्रश्नही उभे ठाकतात. मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आपला माल जगभर खपावा म्हणून अशा पद्धतीच्या स्पर्धांना आयोजित करीत असतात. अशा स्पर्धांमध्ये जिंकलेल्या किंवा सहभागी झालेल्या मुलींना मॉडेलिंगच्या क्षेत्रामध्ये सुद्धा काम मिळते व चित्रपट सृष्टी मध्ये सुद्धा काम मिळते असा अनुभव आहे. एखादीच सुश्मिता सेन किंवा लारा दत्ता किंवा हरनाज संधू हिला चित्रपटसृष्टीत काम मिळालेले आहे किंवा यश मिळालेले आहे असे दिसून येते. परंतु या सौंदर्य स्पर्धांचा प्रभाव लाखो तरुणींवर आहे. ऐश्वर्या राय सुद्धा अशा स्पर्धांची उपज आहे. आज कुठल्याही वस्तूची जाहिरात असली तरी त्या जाहिरातीमध्ये विशेषता मुलींनाच प्राधान्य दिले जाते. दाढीची ब्लेड विकण्याची जाहिरात असली तरी सुद्धा त्यात मुली आढळतात. युरोपची संस्कृती किंवा पश्चिमात्य संस्कृती हीच मुळी भोगवादावर आधारलेली आहे. सुख हे फक्त भौतिक गोष्टीतूनच प्राप्त होऊ शकतं हा त्यांचा विश्वास आहे. विविध जाहिराती,चित्रपटसृष्टी यामधून स्त्रियांचे प्रदर्शन हे एक उपभोग्य वस्तू अशा पद्धतीचे होत राहिलेले आहे. त्यामुळे ही संस्कृती केवळ चेहऱ्याचे सौंदर्य किंवा देहाचे सौंदर्य यावरच भाष्य करताना दिसते. त्यामुळे त्यांच्या सर्व स्पर्धा त्यांचे कार्यक्रम हे सर्वच अशा पद्धतीच्या भोगवादी मानसिकतेवर आधारलेले कार्यक्रम आहेत.

जीवनामध्ये स्त्रीचे स्थान आई,बहीण, मुलगी, पत्नी मैत्रीण अशा अनेक स्वरूपाचे आहे. आई बहीण मुलगी प्रेमळ हवी की सुंदर तर उत्तर येईल प्रेमळ. एखाद्या पुरुषाला विचारले की तुला सुंदर पत्नी मिळेल परंतु ती चांगल्या स्वभावाची नसेल किंवा प्रेमळ नसेल तर चालेल का? तर तो म्हणेल चालणार नाही. प्रत्येकाने स्वतःला सुंदर समजण्यात काय हरकत आहे. जर तुम्ही स्वतःला सुंदर समजत नसाल तर लोकांच्या समजण्याला काय अर्थ राहील. शारीरिक सौंदर्य हे वयाच्या तारुण्यावर अवलंबून आहे. जसे जसे वय वाढत जाईल तसेच असे प्रत्येक सुंदर व्यक्ती ही तितकी सुंदर दिसणार नाही जेवढी पूर्वी दिसत होती. सिनेसृष्टीचा एक काळ गाजविलेला अभिनेत्रीचे आजचे फोटो जर तुम्ही पाहिले तर त्यांच्याकडे पाहून तुम्ही त्यांना ओळखू सुद्धा शकणार नाही इतका त्यांच्यात बदल झालेला आहे. कालची सुंदर पत्नी ही कालांतराने तेवढी सुंदर दिसणार नाही. परंतु तरीही तिचे घरातील स्थान मोठे होते. याला कारण ती मुलांची आई सुद्धा झालेली असते. घरामध्ये




तिचं महत्त्वपूर्ण स्थान असते. याज्ञवल्क्य ऋषी आपल्या पत्नी मैत्रेयीला म्हणतात की पती-पत्नी एकमेकांना त्यांच्या शरीरामुळे प्रिय नसतात तर त्यांच्यात जो आत्मा आहे त्यामुळे ते एकमेकांना प्रिय होतात. आपल्या देशाच्या संस्कृतीमध्ये स्त्रियांना एक विशेष स्थान आहे. पाश्चिमात्य संस्कृती ही बाजारू संस्कृती आहे तर भारतीय संस्कृती ही आदर्शवाद, त्याग, प्रेम, कर्तव्य, सहिष्णुता, करुणा, दया इत्यादी गुणांवर आधारलेली आहे. त्यामुळे मनाचे सौंदर्य हे खरे सौंदर्य आहे व ते सौंदर्य निर्माण करण्यासाठी विविध गुणांची साधना केली पाहिजे. स्त्री असो अथवा पुरुष व्यक्ती म्हणून असे दैवी गुण माझ्यामध्ये निर्माण होईल यासाठी मी प्रयास केला पाहिजे. स्पर्धा ही अशा गुणांच्या निर्मिती करता झाली पाहिजे. केवळ देहाच्या सौंदर्या करता नाही. सौंदर्य विकून पैसे मिळवणे याला आपल्या देशामध्ये चांगले मानलेले नाही. सुंदर दिसण्याच्या अवास्तव आग्रहामुळे कोणामध्ये आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो तर कोणामध्ये न्यूनगंड सुद्धा निर्माण होऊ शकतो. प्रत्येकच माणूस दिसायला सुंदर असेल असे सांगता येत नाही. त्यामुळे सुंदर चेहऱ्याचा बनण्यापेक्षा सुंदर मनाचा बनण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करू शकते. अल्पवयीन मुलींना सौंदर्य स्पर्धेमध्ये खेचून आपण काय साध्य करणार आहोत? लहानपणापासून त्यांच्या मनावर सौंदर्यामुळे पैसे मिळू शकतात हे बिंबवणार आहोत का? लहानपणापासून त्यांच्या मनावर सौंदर्य ही प्रदर्शनाची गोष्ट आहे हे ठसवणार आहोत का? त्यांचं वय हे खेळण्याचे आहे. विविध प्रकारच्या कला गुणांना आत्मसात करण्याचे आहे. विविध प्रकारचे खेळ शिकण्याचे आहे. अशा प्रकारे एक सर्वांगीण विकसित व्यक्तिमत्व त्यांचं बनलं पाहिजे. काही लोक म्हणतील की सौंदर्य स्पर्धेच्या निमित्ताने जे प्रशिक्षण दिल्या जाते त्यामध्ये केवळ रॅम्पवर चालणेच आम्ही शिकवत नाही. केवळ पोशाखाबद्दलच शिकवत नाही तर संवाद कौशल्य व वागणे बोलणे सुद्धा शिकवतो. परंतु संवाद कौशल्य व वागणे बोलणे शिकवण्यासाठी विशिष्ट वेश परिधान करण्याची, शारीरिक सौंदर्याचे प्रदर्शन करण्याची आवश्यकता काय आहे? विशेषतः अल्पवयीन मुलींमध्ये अशा पद्धतीची स्पर्धा आयोजित करून त्यांचे वेळेपूर्वीच काही विशिष्ट विषयांकडे लक्ष आकर्षित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ऐश्वर्या राय, सुस्मिता सेन, लारा दत्ता यांच्यापेक्षाही झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, क्रांतिकारक प्रीतीलता वड्डेदार,शांती घोष अशा पद्धतीचे आदर्श मुलींच्या समोर ठेवण्याची आवश्यकता आहे. आज मुलींनी सर्व क्षेत्रात बाजी मारल्याचे आपल्याला दिसून येत आहे.सॉफ्ट वेअरच्या क्षेत्रामध्ये तर मुली फार मोठमोठ्या पदांवर आणि पगारांवर आरूढ असलेल्या आपल्याला दिसतात. सैन्यामध्ये सुद्धा आता महिलांसाठी कायमस्वरूपी नोकरी बहाल झालेली आहे. थोडक्यात काय? महिलांना स्वतःचा विकास करण्यासाठी, कुशल बनण्यासाठी, पारंगत बनण्यासाठी, स्वतःचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी, जगावर आपली छाप सोडण्यासाठी, स्वतःची प्रगती करण्यासाठी जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध आहेत. केवळ सौंदर्य हे सर्व काही आहे अशा पद्धतीचा संदेश लहान वयात त्यांच्या मनावर बिंबविणे हे कितपत योग्य आहे? समाजातील सर्व स्तरातील लोकांनी याचा विचार करायला पाहिजे. येणाऱ्या काळामध्ये देशाची अर्धी लोकसंख्या असलेली स्त्री शक्ती ही देशाच्या विकासात, प्रगतीत महत्त्वाचा सहभाग देणार आहे. त्यामुळे त्यांच्याकडे एक कुशल मनुष्यबळ अशा पद्धतीने बघणे व त्यांना बनविणे हीच खरी आवश्यकता आहे असे वाटते.

# धर्मनिरपेक्ष शैक्षणिक धोरणाचे पुरस्कर्ते : मौलाना अबुल कलाम आझाद



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात मौलाना अबुल कलाम आझाद शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.**

आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या



३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात "मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली." १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# इस्रोचा प्रवास : सायकल ते चंद्र

आधुनिक केसरी

**येत्या २०३५ पर्यंत भारत स्वत:चे अंतराळ केंद्र उभारेल. तसेच अंतराळात मोठमोठाले उपग्रह सोडण्यासाठी पुनर्वापर करता येणारी रॉकेटस् विकसित केली जातील, अशी घोषणा भारतीय अंतराळ विकास संशोधन संस्थेने (इस्त्रो) केली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत भारताने अवकाशात अप्रतिम प्रवास केला आहे. सायकल आणि बैलगाडीने सुरू झालेला आपला अवकाश प्रवास मंगळ आणि चंद्रापर्यंत पोहोचला आहे. आज भारत अंतराळात मानव पाठवण्याच्या तयारीत आहे. पण हा प्रवास तितका सोपा नव्हता. 1947 साली देश स्वतंत्र झाला तेव्हा परिस्थिती इतकी दयनीय होती की आपल्याकडे खायला अन्नधान्यही नव्हते, जागेची कल्पनाच करू नका. पण सर्व आव्हाने धैर्याने स्वीकारत आम्ही पुढे गेलो. शेवटी, 1962 मध्ये, अशी वेळ आली जेव्हा भारताने अंतराळ प्रवास करण्याचा निर्णय घेतला आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय अंतराळ संशोधन समिती (INCOSPAR) ची स्थापना केली. 1969 मध्ये या INCOSPAR चे नाव 'भारतीय अंतराळ संशोधन संस्था' ठेवले. (इस्रो) फॉर्म घेतला. सध्या इस्त्रो ही जगातील 6 मोठ्या अंतराळ संस्थांपैकी एक आहे.**

## १९६९ साली झाली स्थापना

भारतात जेव्हा अवकाश संशोधन उपक्रम सुरू झाले तेव्हा अमेरिका आणि रशियामध्ये उपग्रहांची चाचणी सुरू झाली होती. 1962 मध्ये, भारत सरकारने अंतराळ संशोधनासाठी भारतीय राष्ट्रीय समिती (INCOSPAR) ची स्थापना करून अंतराळाच्या मार्गावर आपली पहिली पावले टाकली आणि 1963 मध्ये थुंबाच्या पहिल्या दणदणीत रॉकेटने भारताच्या औपचारिक अवकाश कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे डॉ. विक्रम साराभाई यांनी प्रगत तंत्रज्ञानाच्या विकासासाठी INCOSPAR च्या जागी 5 ऑगस्ट 1969 रोजीइस्त्रो ची स्थापना केली. या एपिसोडमध्ये, भारत सरकारने जून 1972 मध्ये स्पेस कमिशनची स्थापना केली आणि डिपार्टमेंट ऑफ स्पेस (DOS) ची स्थापना केली. सप्टेंबर 1972 मध्ये, इस्रो अंतराळ विभागाच्या अंतर्गत आले.

साराभाई, ज्यांना भारतातील आधुनिक अंतराळ कार्यक्रमाचे जनक म्हटले जाते, त्यांचा असा विश्वास होता की अंतराळातील संसाधनांनी माणूस आणि समाजाच्या वास्तविक समस्या सोडवल्या जाऊ शकतात. त्यांनी भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे नेतृत्व करण्यासाठी देशातील सक्षम आणि उत्कृष्ट शास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंतांची एक टीम तयार केली.

## विकास प्रवास

इस्त्रोने अगदी सुरुवातीच्या दिवसांपासून आपल्या योजनांवर चांगले काम केले. इस्त्रोने संप्रेषण आणि रिमोट सेन्सिंगसाठी उपग्रह, अंतराळ वाहतूक प्रणाली आणि अनुप्रयोग कार्यक्रम यासारख्या क्षेत्रांचा त्याच्या यादीत समावेश केला आहे. इतकेच नव्हे तर, 'उपग्रह प्रणाली राष्ट्रीय विकासात महत्त्वाची आहे' हे सिद्ध करण्यासाठी विकास उपक्रमांना त्यांच्या स्वतःच्या उपग्रहांची वाट पाहण्याची गरज नाही, अशी परवानगी इस्रोने दिली; परदेशी उपग्रह वापरा. यानंतर इस्रोने आपल्या मिशनवर वेगाने काम करण्यास सुरुवात केली आणि मागे वळून पाहिले नाही. इस्रोच्या काही प्रमुख कामगिरी पुढीलप्रमाणे आहेत-

19 एप्रिल 1975 रोजी भारताने रशियाच्या प्रक्षेपण केंद्रावरून पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' यशस्वीपणे प्रक्षेपित करून अवकाशाच्या जगात आपले नाव नोंदवले. हा एक प्रायोगिक उपग्रह असला तरी या उपग्रहाने भारताच्या सुवर्ण भवितव्याचा पाया तयार केला होता. आर्यभट्ट उपग्रहाची निर्मिती हे इस्रोसाठी मोठे आव्हान होते कारण त्यावेळी भारतीय शास्त्रज्ञांकडे मूलभूत सुविधा किंवा पुरेशी संसाधने नव्हती. पण भारतीय शास्त्रज्ञांच्या उत्कटतेपुढे या समस्या कमी झाल्या आणि इस्रोचे तत्कालीन अध्यक्ष प्रोफेसर सतीश धवन यांच्या मार्गदर्शनाखाली तरुण संघाने आर्यभट्टाची निर्मिती केली. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे उपग्रह तयार करण्यात सहभागी असलेल्या तरुण टीमने यापूर्वी कधीही स्पेस हार्डवेअर बनवले नव्हते. तो एक छोटा उपग्रह होता; त्याचे वजन फक्त 360 किलो होते पण ते बनवण्यासाठी 3 वर्षे लागली. हा उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी 3 कोटींहून अधिक खर्च आला होता.




इस्रोने 18 जुलै 1980 रोजी SLV-3 ची यशस्वी चाचणी केली, ज्यामुळे भारत स्वतःचे उपग्रह प्रक्षेपित करू शकणाऱ्या देशांपैकी एक बनला. याद्वारे रोहिणी उपग्रह RS-1 कक्षेत ठेवण्यात आला. 1983 मध्ये INSAT-1B लाँच करण्यात आले. याने भारतातील दूरसंचार, दूरदर्शन प्रसारण आणि हवामान अंदाजात क्रांती घडवून आणली. 1994 मध्ये पोलर सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (PSLV) च्या यशस्वी प्रक्षेपणामुळे स्वदेशी प्रक्षेपण क्षमता वाढली. याद्वारे आतापर्यंत 50 हून अधिक यशस्वी मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत.

22 ऑक्टोबर 2008 रोजी इस्रोने 1380 किलो वजनाचे चांद्रयान-1 पाठवले होते, जे 14 नोव्हेंबर 2008 रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर पोहोचले होते. चंद्रावर तिरंगा फडकवताच चंद्रावर आपला ध्वज लावणारा भारत हा चौथा देश ठरला. चांद्रयान-१ ने चंद्रावर पाण्याचा शोध लावला होता.

2014 मध्ये मंगळयान मंगळावर उतरवून इस्रोने विक्रम केला होता. अशी कामगिरी करणारा भारत हा चौथा देश ठरला आहे. इस्रोच्या या मिशनमध्ये केवळ 450 कोटी रुपये खर्च झाले. विशेष म्हणजे मंगळयान पहिल्यांदाच मंगळावर पाठवण्यात भारत हा एकमेव देश होता. 15 फेब्रुवारी 2017 रोजी ISRO ने PSLV-C37 द्वारे एकाच वेळी 104 उपग्रह अवकाश कक्षेत टाकून जागतिक विक्रम केला.

इस्रोने 5 जून 2017 रोजी देशातील सर्वात वजनदार रॉकेट GSLV MK 3 प्रक्षेपित केले. सोबत 3,136 किलो वजनाचा उपग्रह GSAT-19 होता.

डॉ. सुधीर फडके
संपर्क क्र. : 9561594306

यापूर्वी 2,300 किलोपेक्षा जास्त वजनाचे उपग्रह सोडण्यासाठी देशाला परदेशी प्रक्षेपकांवर अवलंबून राहावे लागत होते. इस्रो ने 11 एप्रिल 2018 रोजी नेव्हिगेशन उपग्रह IRNSS लाँच केले. ते स्वदेशी तंत्रज्ञानाने तयार करण्यात आले होते. यासह भारताकडे आता अमेरिकेच्या जीपीएस प्रणालीप्रमाणे स्वतःची नेव्हिगेशन प्रणाली आहे.

27 मार्च 2019 रोजी, ISRO ने आणखी एक मोठी कामगिरी केली. या दिवशी अँटी सॅटेलाइट (A-SAT) ला जिवंत भारतीय उपग्रह नष्ट करण्यात यश आले. अवकाशात उपग्रह पाडणारा भारत हा चौथा देश ठरला आहे.

एवढेच नाही तर 1 एप्रिल 2019 रोजी इस्रोने इलेक्ट्रॉनिक इंटेलिजन्स सॅटेलाइटसह 29 उपग्रह एकाच वेळी प्रक्षेपित केले. यामध्ये 28 विदेशी उपग्रहांचा समावेश होता. प्रथमच इस्रोने एकाच मशिनच्या सहाय्याने तीन वेगवेगळ्या कक्षेमध्ये उपग्रह ठेवले आहेत.

ही प्रक्रिया इथेच थांबली नाही, तर 22 जुलै 2019 रोजी भारताने चंद्रयान-2 या दुसऱ्या चंद्र मोहिमेला हिरवा झेंडा दाखवला. त्याला 'बाहुबली' असे म्हणतात, हे सर्वात शक्तिशाली आणि प्रचंड रॉकेट GSLV-मार्क आहे. माध्यमातून प्रक्षेपित. हे मिशन अयशस्वी ठरले असले तरी देशाने याकडे यश म्हणून पाहिले.

## आव्हाने

1) अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव आणि मानवी अंतराळ उड्डाणासाठी प्रक्षेपित वाहने. 2) श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रात तांत्रिक प्रवीणतेचा अभाव. 3) खाजगी क्षेत्राची मर्यादित भूमिका. 4) प्रकल्पांची संथ अंमलबजावणी. 5) सरकारकडून पुरेसा पाठिंबा मिळत नाही. 6) अंदाजपत्रकीय बंधने.

## भविष्यातील मोहिमा

इस्रो सध्या ज्या प्रमुख मोहिमांवर काम करत आहे ते पुढीलप्रमाणे आहेत-

इस्त्रो सूर्याचा अभ्यास करणारी पहिली भारतीय मोहीम आदित्य-L1 लाँच करण्याच्या योजनेवर काम करत आहे.

आदित्य-एल1 सूर्याचे बारकाईने निरीक्षण करून विविध माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करेल. 2030 पर्यंत अंतराळात स्वतःचे स्पेस स्टेशन उभारण्याची भारताची योजना आहे. यासोबतच 2022 मध्ये पहिले मानवयुक्त मिशन 'गगनयान' पाठवण्याची तयारी जोरात सुरू आहे. इस्रोच्या सर्वात मोठ्या रॉकेट GSLV मार्क-III द्वारे गगनयान प्रक्षेपित केले जाईल. चांद्रयान-2 मधून मिळालेले धडे आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांनी दिलेल्या सूचनांच्या आधारे चांद्रयान-3 वरही काम सुरू आहे. दररोज, इस्रो, स्वतःचा विक्रम मोडत, अंतराळात एक नवीन अध्याय लिहित आहे.

आज भारत केवळ स्वतःचेच नाही तर इतर देशांचेही उपग्रह प्रक्षेपित करत आहे. हे जाणून आश्चर्य वाटेल की 1999 पासून, ISRO ने 34 देशांमधील 345 परदेशी उपग्रह पोलर सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (PSLV) द्वारे त्यांच्या व्यावसायिक शाखांद्वारे यशस्वीरित्या प्रक्षेपित केले आहेत. सध्या, 18000 हून अधिक कामगारांसह, इस्रो अंतराळ आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवीन विक्रम निर्माण करत आहे.

# दिवाळी अंकातून वर्तमानाची सल आणि उकल व्यक्त व्हावी



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**दिवाळी अंक हे महाराष्ट्रीयन साहित्य संस्कृतीमध्ये साहित्याचा बदलत जाणारा चेहरा मोहरा दाखवणारे एक दर्पण आहे असे मला वाटते. दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यात साधारणपणे त्या वर्षाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. सत्यकथाच्या दिवाळी अंकापासून रसिकांनी दिवाळी अंकाचे विविध पैलू आणि बदलत जाणारे स्वरूप जवळून पाहिले आहे. मागील शंभर वर्षात माणसाचे जीवनमान ज्या पद्धतीने बदलले त्या पद्धतीने साहित्य आणि संस्कृती बदलत गेली. त्यामुळे दिवाळी अंकातील साहित्य सुद्धा कालानुरूप बदलत गेलेले दिसून येते.**

मी साधारणपणे इयत्ता सहावीत असताना लोकमत नागपूर, नागपूर पत्रिका, पुढे लोकसत्ता आणि लोकप्रभा या दिवाळी अंकात येणारे साहित्य आवर्जून वाचायचो. पुढे लोकमत कडून साधारणपणे 90 च्या दशकात आलेला विनोद विशेष अंक मी आजवर जपून ठेवला होता. दिवाळी अंकाचे एखाद्या विषयाला घेऊन साहित्य बोलविण्याचा प्रभात मागील पाच दहा वर्षात सुरू झाला. पण उद्या कुणी टीव्ही विषय अंक काढत असेल आणि साहित्यिक त्या विषयावर कथा कविता आणि ललित लिहून पाठवत असतील तर ते साहित्य त्यांना उस्फुर्तपणे सुचले असे कसे म्हणता येईल? थोडक्यात मागणी तसा पुरवठा या वृत्तीमुळे दिवाळी अंकातील साहित्याची  गळचेपी होत आहे असे म्हटले तर अनेकांना ते पटणार नाही. अर्थात काही दिवाळी अंक प्रत्येक वेळी सामाजिक मानसिकतेवर बोट ठेवणारे असतात तर काही मनोकल्प, थिंक पॉझिटिव्ह, पुरुष स्पंदन,  पुरुष ऊवाच अशी काही नामावली नेहमीच आपले वेगळेपण यशस्वीपणे राखून असते. दिवाळी अंकातील वैचारिक लेख हा एक चिंतनाचा विषय असतो. त्यातून सांप्रत वर्तमान काळातील परिस्थितीवर भाष्य केले जाते. कथा आणि कविता ह्या मात्र जास्तीत जास्त प्रमाणात वरवरच्या येत आहेत. वर्तमानपत्राकडून येणाऱ्या दिवाळी अंकात खूप मोठया प्रमाणात जाहिराती दिसून येतात व्यवहारिक दृष्टीने आपण त्याला चुकीचे म्हणणार नाही मात्र कधी कधी मोठ्या प्रमाणात जाहिराती मिळूनही कवी आणि लेखकांना मानधन देणे तर दूरच लेखकांनी त्यांच्या दिवाळी अंकाची विक्री करावी अशी मानसिकता काही संपादक ठेवून असतात. एक संपादक ज्या साहित्यिकाचे साहित्य दिवाळी अंकात समाविष्ट केले आहे त्याने किमान दहा अंक विकत घेऊन आपल्या परिघातील लोकांना




दिवाळी भेट म्हणून वाटावे अशी अपेक्षा ठेवतात त्यांना मला असे विचारावे वाटते की ,वर्तमान काळात जर एक साहित्यिक दहा दिवाळी अंकासाठी लिखाण करीत असेल आणि प्रत्येक संपादक त्याला 10 ते 20 अंक घ्यायला  सांगत असेल तर ते शंभर दोनशे अंक विकत घेऊन भेट म्हणून वाटणे सामान्य आर्थिक परिस्थिती असणाऱ्या लेखकाला कसे परवडेल? किंवा एक नामवंत साहित्यिक दिवाळी अंक वाटत आहे आणि माझे लेखन वाचा अशी विनंती करत आहे असे चित्र मराठी साहित्यासाठी सुखकर असेल का? मला वाटते नक्कीच नाही. दिवाळी अंकातही काही लेखकांना आणि कवींना सातत्याने स्थान देणे, काहींना सातत्याने टाळणे हा प्रकारही दिसून येतो. दिवाळी अंकात दलित साहित्य  किंवा आंबेडकरवादी आणि परिवर्तनवादी साहित्य प्रकर्षाने टाळले जाते ही ही पाहायला मिळत आहे. उत्तर प्रदेशातील एका अत्याचारावर लिहिलेली कविता दिवाळीच्या वेळेस लोकांच्या मनाला प्रसन्नता देणार नाही म्हणून आम्ही छापू शकत नाही असे आवर्जून सांगणारे संपादक हे विसरतात की दिवाळी अंक आणि त्यातील साहित्य त्या सांप्रत वर्तमानाचा आरसा असले पाहिजे त्यामुळे माणसाच्या मनातील आणि तिची उकल याचा उहापोह दिवाळी अंकात झालाच पाहिजे झालाच पाहिजे. काही संपादक मात्र अस्वस्थ वर्तमान नेमकेपणाने टिपून वाचकांना विचार करायला  प्रवृत्त करतात. जवळपास दहा टक्के तरी संपादक आपल्या लेखकांना अंकासोबत मानधन पाठवतात हेही आवर्जून सांगावसे वाटते. एक नामांकित दिवाळी अंक 95 वर्षाच्या कवीची निरर्थक कविता छापू शकतो मात्र आपल्या विचारधारेला रुचेल अशी कविता देत नाही म्हणून समकालीन कवींच्या कविता बाजूला ठेवतात असेही वातावरण आजच्या काळात दिसून येते. दिवाळी अंकांचे भौतिक रूप मोठ्या प्रमाणात बदलले असून ऑनलाइन अंकांचे सुद्धा पेव फुटलेले आहे. मात्र आधुनिक काळात भौतिक रूप पालटले तरी अनेकांची मानसिकता अजूनही पूर्वपार चालत आलेल्या परंपरा कायम ठेवत परिवर्तन वाद टाळणारी आहे असे आवर्जून सांगावेसे वाटते. मी स्वतः दरवर्षी 30 ते 35 दिवाळी अंकातून रसिक वाचकांना भेटतो. त्यामुळे मी वरील भूमिका व्यक्ती म्हणून मांडली नसून समकालीन साहित्यिकांचा प्रतिनिधी म्हणून मांडली आहे असे सांगावे वाटते.  लेखकांच्या नावानुसार आज दिवाळी अंक खपत नाहीत असे एक संपादक माझ्याशी बोलत होते आणि त्यामुळेच आम्ही लेखकांना भेट अंक न देता अंक विकत घ्यायला लावतो असे ते बोलले. प्रचंड प्रमाणात जाहिरातीतून पैसा वसूल करून पुन्हा लेखकांना पैसे मागण्याची वृत्ती बाळगणारे संपादक हे विसरतात की लेखकांनी आपल्याला साहित्य देणेच बंद केले तर आपला अंकच निघणार नाही मग जाहिराती कुठून भेटणार? मात्र आजच्या काळातील लेखक कवी प्रसिद्धीसाठी अनेकदा स्वतःचा स्वाभिमान विसरलेले दिसतात आणि गडगंज पगार असलेले  किंवा आर्थिक दृष्ट्या सबळ असलेले  साहित्यिक लोक वरील गोष्टीला मान्यता  देतात पण ते  हा विचार करत नाहीत की साहित्य क्षेत्रातील अनेक प्रतिभावंतांना कवी अजीम नवाज राही म्हणतात त्याप्रमाणे एक रुपयाचं नाणं बैलगाडीच्या चाका इतका मोठा दिसू शकतं. कुठेतरी साहित्यिकांनी साहित्याचा दर्जा आणि आशय ह्या सोबतच स्वतःचा स्वाभिमान जपण्याची आणि संपादकांनी स्वतःच्या नियतकालिकाचा दर्जा राखून सोबतच नव्या जुन्याची सांगड घालत येणाऱ्या पिढीला दर्जेदार साहित्य देत लेखक आणि साहित्यिकांचा सन्मान जपण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. संपादक आणि लेखक हे वेळीच सावध झाले नाही तर दिवाळी अंक हा निव्वळ साहित्याचा बाजार आणि व्यवहार होऊन बसेल एवढे निश्चित!

# दाऊदच्या भारतात पुन्हा कारवाया सुरु ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कुख्यात डॉन दाऊद, शकील, मोहम्मद सलीम कुरैशी उर्फ सलीम फ्रूट यांच्याविरोधात राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आरोपपत्र दाखल केले आहे. दोन महिन्यांपूर्वी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) कोट्यवधीची अवैध माया जमविणाऱ्या आणि ऐशोआरामात आयुष्य जगणाऱ्या दाऊदवर 25 लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. दाऊद या चिंधीचोराच्या मुसक्या आवळून त्याची घरवापसी करण्याचा चंग तपास यंत्रणानी बांधला आहे, हेच यावरून दिसून येत आहे. मात्र याला कितपत यश मिळेल, हे पाहावे लागणार आहे.**


टेरर फंडिंग संदर्भात महत्त्वपूर्ण खुलासा राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) केला आहे. त्यानुसार मुंबईत दहशतवादी कारवाया आणि मोठया घटना घडवण्यासाठी मागील चार वर्षांत हवालामार्फत सुमारे 12 ते 13 कोटी रुपयांची रसद दाऊदने भारतात पाठवली. दाऊद इब्राहिम आणि त्याच्या साथीदारांनी दुबईमार्गे पाकिस्तानातून 25 लाख रुपये पाठवले.

दाऊद, शकील, मोहम्मद सलीम कुरैशी उर्फ सलीम फ्रूट यांच्याविरोधात दाखल केलेल्या आरोपपत्रात हा खुलासा करण्यात आला आहे. त्याचबरोबर रक्कमेची देवाण-घेवाण करण्यासाठी एका 'डर्टी मनी' हा कोड वर्डचा वापर करण्यात येत होता.

आरोपपत्रात म्हटले आहे की, मुंबईत दहशतवादी कारवाया आणि मोठया घटना घडवण्यासाठी दाऊद इब्राहिम आणि त्याचा जवळचा साथीदार छोटा शकीलने दुबईमार्गे पाकिस्तानातून 25 लाख रुपये पाठवले. एनआयएच्या आरोपपत्रानुसार हा पैसा सुरतमार्गे भारतात आला होता आणि नंतर मुंबईला पोहोचला होता. हे पैसे हवालाद्वारे आरिफ शेख आणि शब्बीर शेख यांना पोहोचवले. डी गँग अथवा छोटा शकीलच्या नावाने सलीम फ्रूट हा खंडणी गोळा करत असे. एका बांधकाम व्यावसायिकाने खंडणीबाबतची तक्रार नोंदवल्यानंतर सलीमला अटक करण्यात आली. सलीम फ्रूट हा छोटा शकीलचा नातेवाईक देखील आहे. त्याच्या माध्यमातून खंडणीचा पैसा देशाबाहेर जात असल्याचा आरोप आहे.

तसेच, एनआयएने केलेल्या दाव्यानुसार, शब्बीरने 5 लाख रुपये ठेवले होते आणि उर्वरित रक्कम एका साक्षीदारासमोर आरिफला दिली होती. एनआयएने सांगितले की, हे लक्षात घेण्यासारखे आहे की, ए-2 (शब्बीर) कडून 9 मे 2022 रोजी त्याच्या घरावर करण्यात आलेल्या जप्तीदरम्यान 5 लाख रुपये जप्त करण्यात आले होते. पैसा दोन्ही बाजूंनी भारतातून फायनान्सर्सकडे जात होता. यात विशेषतः खंडणीच्या पाच स्वतंत्र घटनांची यादी केली आहे. एकामध्ये, आरिफ आणि शब्बीर यांच्यामार्फत हवालामार्फत एका दशकात साक्षीदाराकडून सुमारे 16 कोटी रुपये उकळले गेले.दरम्यान, दाऊद इब्राहिम पाकिस्तानात बसून भारतात दंगल घडवण्याचा कट रचत असून त्याने दंगल सेल स्थापन केला आहे. दाऊदचे दिल्ली, मुंबई आणि देशातील मोठी शहरे आणि बडे राजकारणी लक्ष्य असल्याचे आरोपपत्रात उघड झाले आहे. तसेच दहशतवादी आणि अंडरवर्ल्ड माफियांच्या मदतीने भारतातील तरुणांना ड्रग्जच्या माध्यमांतून पोकळ करण्याचा कट पाकिस्तान रचत असल्याची धक्कादायक माहिती आता समोर आली आहे. देशातील अमली पदार्थांच्या तस्करीच्या वाढत्या प्रकरणांचा तपास करणाऱ्या विविध यंत्रणांनी याबाबत मोठा खुलासा केला आहे.

अंडरवर्ल्डच्या कारवाया टोकाला पोहोचल्या असताना दाऊदने संपूर्ण मुंबईवर आपली दहशत निर्माण केली होती. 1990 च्या दशकांत दाऊदने दक्षिण मुंबई पासून ते वसई-विरार पर्यंत आपले साम्राज्य वाढविले होते. तर तो दुबईत बसुन मुंबई चालवित होता. दक्षिण मुंबईत त्याने छोटा शकील तसेच हसिना पारकरच्या सहाय्याने कारभार पाहण्यास सुरुवात केली होती. मध्य मुंबईत रमा नाईकने दाऊदच्या वर्चस्वाखाली काम करण्यास सुरुवात केली होती. पूर्व उपनगरांत छोटा राजनने. दाऊदकरीता वर्चस्व निर्माण केले होते. पश्चिम उपनगरात भाई ठाकुरने दाऊदच्या नेतृत्वाखाली दहशत निर्माण केती होती. अशा प्रत्येक ठिकाणी आपले खास हस्तकं नेमून दाऊदने दहशत निर्माण केली होती. यावेळी दहशतीला घाबरुन अनेक सरकारी बाबु, राजकीय नेते तसेच पोलीस यंत्रणा देखील दाऊदसाठी काम करीत होते. मात्र वेळोवेळी दाऊद टोळीत फूट पडत होती. फुटलेले त्याचेच गँगस्टर त्याच्या जिवावर उठत होते. अशावेळी दाऊदने एक तर पोलिसाना त्यांची टिप देऊन त्यांचा एन्काऊंटर केला अथवा गँगवॉर घडवून आणत त्यांचा खात्मा केला. अशातच दाऊदने त्याचे खास हस्तक असलेले छोटा राजन आणि शकीलला दुबईला बोलावून घेतले. येथुन दाऊदने पून्हा एकदा मुंबईसह संपूर्ण देशांत गुन्हेगारी वाढविण्यास सुरुवात केली. यादरम्यान, प्रत्येक समुद्री किनाऱ्यावर आणि गोदीत दाऊदसाठी काम करणारी एक फळी निर्माण झाली. त्याकाळी सागरी मार्गाने मोठ्या प्रमाणांत तस्करी होत असे. सागरी किनाऱ्यावर ज्याचे वर्चस्व त्याचे देशातील सर्व वैध-अवैध व्यवसायावर राज्य. हे माहीत असल्याने, दाऊदने देशातील सर्व समुद्र किनाऱ्यावर लँडिंग एंजट नेमले होते. या लँडिंग एजंटची यादी त्याकाळी पोलीस दलाकडे आली असताना देखील म्हणावी अशी ठोस कारवाई त्याकाळी करण्यात न आल्याने, भविष्यात 12 मार्च 1993 सालचा साखळी बॉम्बस्फोट घडून आला. रत्नागिरी, बाणकोट खाडीत बशीर अहमद करीम मांडलेकर हा दाऊदचा लँडिंग एजंट होता. रायगड, दिघी खाडी येथे माजीद मेनन, रत्नागिरी आणि मुंबई परिसरात जॉनी दाढी



उर्फ जॉन पोबलस, मुंबई, रुईया पार्क, जुहु येथे बस्त्याव, गुजरात, जामनगर या ठिकाणी मामूमियॉ पंजूमियो. आणि सुजाद मियॉ, भट्टी व्हिलेज, आकसा, मुंबई येथे कोळी, मुंबई, कफ परेड, ससुन डॉक जॉन लंबु, तर मुंबई, डॉक्स आणि न्हावा-शेवा फजल आणि मॅकबल, मुंबई, घड्याळ गोदी परिसरात मोहम्मद अली उर्फ ममद्या, कर्नाटक आणि केरळ येथे अत्ता मलबारी हे लँडिंग एजंट दाऊदसाठी काम करीत होते. या लँडिंग एजंटच्या मदतीनेच रायगड येथे सागरी मार्गाने पाकिस्तानातून आरडीएक्स अणि शस्त्रसाठा आला होता. तो शस्त्रसाठा टायरग मेमनच्या माहीम येथील गॅरेजमध्ये आणून संपूर्ण शहरात बॉम्बस्फोट घडवून आणले होते. त्यानंतर दाउदने पाकिस्तानात पळ काढला. आजतागायत तो पाकिस्तानात लपून बसला आहे. मात्र वेळोवेळी पाकिस्तान याला नकार . देत आहे. कारण पाकिस्तानची 80 टक्के अर्थव्यवस्था ही दाउदच्या अवैध व्यवसायावर अवलंबून आहे. दाउदने अमेरिका, ऑस्टेलिया, आशिया, आफ्रिका आणि युरोप खंडात मोठ्या प्रमाणांत अवैध व्यवसाय सुरु केले आहेत. शस्त्रांची तस्करी, डरॅग्जचा व्यवसाय, अवैध भंगार व्यवसाय, सुपारी किलिंग आणि रिअल इस्टेट अशा प्रकारच्या व्यवसायात दाऊदने कित्येक कोटींची माया जमविली आहे. यातील काही संपत्ती तो स्वतःच्या सुरक्षेसाठी पाकिस्तान तसेच आखाती देशांना देत आहे. तसेच तो कराची येथील ज्या क्रिप्टन एरियात राहतो त्याचा पत्ता देखील भारतीय तपास यंत्रणानी वेळोवेळी पाकिस्तान आणि युनोला दिले आहेत. मात्र सातत्याने नकारघंटेचा बुरखा पाकिस्तानने ओढून घेतला आहे. त्याला नाही म्हटले तरी अमेरिका, चीनची फूस आहे. कारण अमेरिकेला स्वतःचे आशिया खंडातील हितसंबध जपण्यासाठी पाकिस्तानची आवश्यकता आहे. मात्र ज्या दाऊदने भारतीय भूमीवर आतापर्यंत अनेक दहशतवादी संघटनांचा आधार घेत जो नरसंहार केला आहे. त्याची गणती नाही. अशाच प्रकारचा नरसंहार अमेरिकन भूमीवर झाला असता तर अमेरिका शांत बसली असती का? हे 9/11 च्या हल्ल्याच्या उदाहरणाने दाखवून दिले आहे. कारण या हल्ल्याला जबाबदार असलेल्या अल-कायदा या दहशतवादी संघटनेच्या ओसामा बिन लादेन आणि अलजवाहिरी या दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी अमेरिकेने किती वर्षे अफगाणिस्तानात काढली हे जगाला माहीत आहे. मात्र ज्यावेळेस दाऊदचा संबध येतो, त्यावेळेस अमेरिका देखील मुग गिळून गप्प बसत असल्याचे अनेकदा आढळून आले आहे. मात्र, आपल्या तपास यंत्रणा देखील हातावर हात ठेवून शांत बसल्या नाहीत. त्यांनी देखील. दाउदच्या मुसक्या आवळून घरवापसी करण्याचा चंग बांधला आहे. यामध्ये अग्रेसर आहे ती राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए). नुकतेच एनआयएने दाउदवर 25 लाखांचे बक्षीस जाहीर केले आहे. तर छोटा शकील दाऊदचा भाऊ अनिस यावर 20 लाख. तसेच 1993 च्या साखळी बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपीपैकी एक असलेला टायगर मेमन आणि अब्दुल रउफ सारख्या गँगस्टरवर 15 लाखांचे बक्षीस जाहीर केले आहे. यामुळे कोणत्याही परिस्थितीत दाऊदची मुसक्या बांधुन घरवापसी करण्याची रणनिती तपास यंत्रणांनी आखली आहे. दाऊदला पाकिस्तानातून मुसक्या आवळून आणणे एवढे सोपे नाही. गेली 29 वर्षे दाउदला पकडण्यासाठी तपास यंत्रणा अहोरात्र झटत आहेत. मात्र अद्याप त्यांना यश आले नाही. तरी देखील तपास यंत्रणा शांत बसल्या नाहीत. दाउदला पकडण्यासाठी त्या जंग जंग पछाडत आहेत. नुकतेच काही माहिन्यांपूर्वी एनआयएमध्ये दाखल झालेले महाराष्ट्र केडरचे आयपीएस अधिकारी अतुलचंद्र कुलकर्णी यानी दहशतवादी संघटना तसेच दाउदच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी जोरदार कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. अशातच दाउदवर बक्षीस जाहीर करण्याचे हे त्यांच्याच रणनितीचे एक पाऊल म्हटले तरी वावगे ठरणार नाही. दाऊद नावाची किड देशात आणुन त्याचे समुळ नष्ट केल्याशिवाय इतर गुन्हेगार अथवा गुन्हेगारी संघटनाना आळा बसणार नाही. यासाठी दाऊदच्या मुसक्या आवळून त्याची घरवापसी करणे आवश्यक आहे.

# बेईमानांना दुनिया धार्जिण



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606068

आधुनिक केसरी

**आपण नको-नको ते हौशे,नवशे,गवशे सगळेच जमा करत सुटतो.घरुन निघालो कि नाक्यापर्यत जावस्तोर पाच-पंन्नास ओळखी-पाळखीची छोटी-मोठी बहुगुणी कार्यकर्ते भेटत असतात.आपण आपल्या कामाशी एकनिष्ठ राहून प्रामाणिकपणे काम करत असलो तरि तेच ते ज्यांच्यासाठी आपण एकनिष्ठ राहतो.तेच लोक पुढे चालून आपल्याशीच दगाबाजी करतात.खोट-नाट बोलुन फसवा-फसवीचे धंदे करतात.आपल-आपल म्हणून आपण त्यांच्या चुका मायेच्या पोटी आपल्या पंखाखाली झाकून ठेवत असतो.तेव्हा ते बेमान होऊन उपकाराची जाणीव विसरून जातात.**

तुम्ही ही सगळी उठा ठेव आपल्यांसाठी करा. कि इतरांनसाठी करा.त्यांना कुणालाच त्याच काहीच मुल्य नसतं.उल्ट तेच आपल्याला गुल्ला देऊन,आपल्याला दगा करतात.लाज विकल्यागत वर चढीची भाषा बोलायला लागतात. ते लोक फक्त त्यांचाच फायद्याच्या शोधाच्या विचारात डुबलेले बघायला मिळतात.जे लोक इमानदारीन आपल काम,सेवा करत असतात. त्यांच्या मागे अडचणी वादळासारखे हात धुऊन मागे लागलेले दिसतात. असे विविध रुपी माणस पाहायला,अनुभवायला मिळतात. भल्या लोकांची कामे, सरळ रस्त्याने निर्विघ्न कधीच पूर्ण होत नाही. त्यांच्या वाटेत भल्या मोठ्या अडचणी मधे-मधे सारखं-सारखं आडकाठी घालत असते. ते काम इतरांच्या भल्याच,फायद्याच असो.! वा एखाद्या व्यक्ती निस्वार्थ मनाने सेवा अर्पण करत असेल तर बोट घालणारे,नावे ठेवणारे कपटी माणसं, कपाळाला टिळा, गळ्याला भस्म लावणारेही विद्रोहावर उतरतांना दिसतात. इमानदारीला बेमान झालेले लोक अन्यायाविरुद्ध कधीच आवाज उठवतांना कुठ दिसत नाही. त्यावेळेला मुंग गिळून गप्प बसलेले दिसतात.पण त्या जागी बोलायचं झाल तर चांगल्या कामात वाद विवाद बळजबरीने उकरुन काढतांना दिसतात.

अडीअडचणीत साथ देणाऱ्या माणसांचे उपकार आयुष्याच्या पुस्तकात सोनेरी अक्षरात कोरुन ठेवायचे सोडून.उल्ट त्याच माणसाच्या पाठीमागून वार करतात.आणि नाही काही जमल तर त्यालाच चार-चौघात बदनाम करतात.अशा माणुसकीला वेश्याला बांधणारे गल्लीच लोक आज-काल पहायला,अनुभवायला मिळतात. जोवर एखाद्या कडून फायदा,तोपर्यंत आपण दोघे दोस्त. एकदाचा फायदा संपला की मग तो ना-ना ठिकाणी फालतू व्यस्त.ज्यांच्या फायद्यासाठी जो मारतो उड्या.त्यालाच ही फालतू लोकं उद्याला घालायला लावतात कुरघोड्या.

जो करतो भला,त्याचीच लोक पुष्टभाग शेकारतात. मग ते आपल्या रक्ताचे असो वा नाते संबंधातले. त्यामुळे गाव पंक्तीपेक्षा डबा पार्टी बरी. लोकांना पारखून आता पाणीही फुकून प्याव लागणार आता. हे खजुराहो सारखे,स्वार्थाच्या वासनेत डुबवणाऱ्या अशा खंडीभर लोकांना जवळ केल्यापेक्षा. मोजक्या पण जीवाला-जीव देणारे स्नेही जोडा. मग ते जातीचे वा रक्ताचे असो वा नसो. जशी ही दुनिया जेवढी सुंदर आहे. तेवढी विद्रूप ही आहे. जे लोक तुमच्या चारित्र्याला चार-चारदा भोसकतात, तेच बिनलाजी लोक पुन्हा तुमची परिस्थितीचा अंदाज-बांधून घेऊन पुन्हा तुमच्या आयुष्यात चोच मारायला येतात लापट सारख.अशा या कपटी लोकांच्या सावलीत उभे राहुन नाते सबंधाचे,आपुलकीचे बांध बांधायचे नसते.

या आयुष्यात लय चढ उतार येत असतात. जो या चढ उतारात आपल्या सोबत आहे.तसच आपणही त्याच्या आयुष्याच्या चढ उतारात सोबत असायला हवं.आणि अशा माणसांन सोबत आयुष्य जगले तर छाती ठोकपणे सांगायला गर्व वाटेल.आयुष्यात कितीही मोठं संकट आलं तरी ते सहज दूर करता येत.आणि आनंदात आयुष्य खुलवता येत.आजकाल तर लोकांची मने स्वार्थानं आणि डोळ्यांची बुबळ अंहकारानं भिजलेली दिसतात.लोकांना माणुसकीचं काहीच पडलेलं नाही. माणूस लापट असो,बेमान असो,स्वतःचा स्वार्थ साध्य झाला की बाकी तो माणूस चांगला वाईट याच काहीच घेणं-देणं नसतं.वाईट कामे करायला चांगली माणसं कधीच तयार होत नाही. वाईट माणसं चांगले काम करतील याची ग्यारंटी तर नसल्यात जमा आहे. चांगल्या लोकांच्या आयुष्यात सुख यायला जास्तीचा वेळ लागतो. आणि दिर्घ काळ टिकतो. आणि वाईट लोकांच्या जीवनात वाईट मार्गाने लवकर लवकर येणार सुख क्षणभर टिकेल.याचीही ग्यारंटी नाही. आजकालची ही दुनियादारी इमानदार लोकांना भावनारी नाही.तर बेमानांना धार्जिण आहे. इमानदार माणसाने जरी बेंबीच्या देठापासून खर बोलला तर या दुनियेला पटत नाही.आणि लबाडाने मिर्च मसाला लावून सांगितले की लगेच त्यावर भरवसा टाकतात त्याला जवळ धरतात. टोपी घालणाऱ्याच्या गळ्यात फुलांचा हार असतो. आणि खर बोलणाऱ्याच्या गळ्यावर सुरा असतो. आजही उघड्या डोळ्यांना दिसत असत. इमानदारीने जगणारे लोक बड्या हलाखीच्या परिस्थितीतून जातांना दिसतात.आणि लबाडी लोक ऐटीत वावरतांना दिसतात.मनमोकळ्या स्वभावांची माणस सगळ्यांना आपलस मानतात. आणि कपटी लोकांच्या वागण्यात, विचारात, मोबदल्याच्या भुकेची-अपेक्षांची लालूच असते. त्यांच्या सूडाला त्यांच्या कपटी पणाची धार असते. अशा या फासांपासून भोळ्या-भाबड्या,विश्वासू लोकांचे गळे शाबूत राहावे.आणि माणसातल्या माणुसकीचे मिलन व्हावे. बेमानांना दुनिया धार्जिण नसून इमानदारांना दुनिया धार्जिण झाली पाहिजे.

# पंतप्रधानांचा आणखी एक निर्णय ठरतोय शेतकऱ्यांसाठी फायद्याचा

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी एक निर्णय घेतल्यानंतर त्यामागे शेतकऱ्यांचे कसे भले होते ? हा आर्थिक चमत्कार देशातील समस्त शेतकरी बांधवांनी चार दिवसांपूर्वीच अनुभवला आहे. केंद्र सरकारने सोयाबीन व इतर तेलबीयांच्या साठवणुकीवरील निर्बंध हाटवता क्षणीच अवघ्या काही तासातच सोयाबीनचे भाव वाढले. पाच हजारी असलेले सोयाबीन या निर्णयामुळे सहा हजार रूपयांपर्यंत पोहोचले. कदाचित सात हजार जावू शकेल. नेतृत्वात कल्याणाची दुरदृष्टी असेल तर त्याचा फायदा कसा होतो ? या कृतीतून देशवासियांनी पाहिला असल्याचे प्रतिपादन भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले.



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आमच्या प्रतिनिधी बोलताना कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, मागच्या आठवड्यात देशातील शेतकऱ्यांनी केंद्र सरकार तथा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या एका निर्णयाचा घेतलेला अनुभव आर्थिकदृष्ट्या क्रांतीकारक कसा ठरला ? ज्यातून सिद्ध झालं. वास्तविक पहाता मागच्या आठ वर्षांपासून नरेंद्रजी मोदी यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविणारे महत्वाचे निर्णय घेतले. धानाच्या हमीभावात सतत होणारी वाढ ज्यामुळे भाव वाढीची स्पर्धा देशाच्या कृषी क्षेत्रात सुरू झाली. सोयाबीन, ज्वारी, बाजरी, तीळ, मोहरी, गहू यांच्या हमीभावात काही वर्षांपासून सतत वाढ होते आहे. वास्तविक पहाता देशातील शेतकऱ्यांनी सोयाबीनचे भाव जास्तीत जास्त चार हजारापर्यंत पाहिले. पण, वर्तमानकाळात हेच भाव आठ हजारांपेक्षा जास्तीचे पाहिले. कापूस सुद्धा दहा हजार पेक्षा अधिक प्रति क्विंटल दराने विक्री होताना दिसतो. खरे म्हणजे शेतकऱ्यांसाठी केलेले तीन कायदे लाभदायक होते, त्यांची प्रतिष्ठा वाढवणारे पण, विरोधकांनी स्वतःच्या राजकारणापोटी शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदुका ठेवत कायद्याला मिळवलेली स्थगिती योग्य कृती नाही. काळ्या आईची सेवा करणाऱ्या बळीराजाला सरकारी व्यवस्थेतून पगार मिळू शकते हे कधी स्वप्नातही कुणी पाहिले नाही. मात्र पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी शेतकरी सन्मान योजनेद्वारा गरजू शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रूपये देण्याची योजना राबवून केलेला सन्मान कमी नाही. त्याच विचारांची व्यवस्था राज्यात पुन्हा आल्यानंतर शिंदे - फडणवीसांनी देखील केंद्राच्या धर्तीवर मुख्यमंत्री सन्मान योजना सुरू करण्याचा घेतलेला निर्णय कौतुकाचा म्हणावा लागेल. आपल्या पत्रकात पुढे कुलकर्णी म्हणतात, यंदा सोयाबीनचे भाव पाच हजारांपेक्षा जास्त जातील अशी शक्यता वाटत नव्हती. मात्र केंद्र सरकारने सोयाबीन व इतर तेलबियांच्या साठवणुकीवरचे निर्बंध एका निर्णयात हटवून टाकले आणि ज्यातून शेतकऱ्यांचे आर्थिक भविष्य घडले. या निर्णयातून बाजारात आलेल्या सोयाबीनची शेतकरी साठवणुक करू शकतो किंवा व्यापारी देखील ज्यामुळे सोयाबीनची आवक कमी होताना दिसत असून ज्याचा परिणाम भाव वाढीवर काही क्षणात सुरू झाला. अवघ्या पाच दिवसांतच पाच हजारांवर असलेले सोयाबीन सहा हजारांच्या जवळ गेले. कदाचित उद्या सात हजार रूपये प्रति क्विंटल भाव होवू शकतो.

एक निर्णय शेतकऱ्यांच्या फायद्याचा कसा ठरू शकतो ? हे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रत्यक्ष कृतीतून देशवासियांनी पाहिले आहे. शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून मोदी सरकारवर नाराज असलेले काही नेते आता या निर्णयाचे स्वागत का करीत नाहीत ? असा सवाल राम कुलकर्णी यांनी केला असून राज्यात देखील शिंदे - फडणवीस सरकारने शेतकऱ्यांचे हित लक्षात घेवून 12 तास वीज मिळवुन देण्यासाठी सुरू केलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना निश्चित वरदान ठरणार असल्याचा दावा भाजपा प्रवक्ते कुलकर्णी यांनी आमच्या प्रतिनिधी बोलताना केला आहे.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक : मौलाना अबुल कलाम आझाद



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**मौलाना अबुल कलाम आझाद यांची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी बघता केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २००८ पासून त्यांची जयंती "राष्ट्रीय शिक्षण दिन" म्हणून संपूर्ण देशात साजरी केल्या जाते. शिक्षणात कोणताही भेद न करता सर्वांना समान न्यायाची धोरणे अवलंबण्याची नीती सुकरतेने चालविली म्हणून त्यांच्याच नावाने हैद्राबादस्थित मौलाना आझाद मुक्त विद्यापीठ स्थापन करून शिक्षणाचे प्रवाही वारे आजही चालू आहे. हिंदू-मुस्लिम धर्मात भेद न करता एकच माणुसकी धर्मात तोलणारे व्यक्तिमत्व हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीकच होते असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.**

स्वातंत्र्य चळवळीचे नेते, राजकीय पुढारी, उत्तम वक्ते, उत्कृष्ठ लेखक,राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष, मुस्लिमांमध्ये राष्ट्रवादीची बीजे रोवणारे, शैक्षणिक धोरण निरपेक्षपणे राबविणारे, हिंदू-मुस्लिम एकतेचे पुरस्कर्ते म्हणून मौलाना अबुल कलाम आझाद यांना ओळखले जाते. वडील भारतीय आणि आई सौदी अरेबियन असलेल्या पवित्र भूमीत मक्का याठिकाणी त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ साली झाला. वडिलांना सौदी अरब मधील वातावरण न मानवल्यामुळे दोन वर्षांनी भारतातील कलकत्ता या ठिकाणी आले. मौलाना आझाद हे लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. म्हणतात ना की, बाळाचे पाय पाळण्यात दिसतात त्याचप्रमाणे त्यांची कारकीर्द बहरत गेली.मौलाना आझाद यांचे मूळ नाव मोहिउद्दीन अहमद असे होते आणि अबुल कलाम हे त्यांना मिळालेली वाचस्पती पदवी होती.विविध वर्तमानपत्रात आझाद या टोपण नावाने लेखन करीत असल्याने त्यांचे नाव अखेर मौलाना अबुल कलाम आझाद असे पडले.मौलाना आझाद यांना इंग्रजी,फार्सी,उर्दू,अरबी या भाषेत पारंगत होते.या सर्व भाषांमध्ये लेखन करीत असल्याने मुस्लिमांच्या गळ्यातील ताईत तर होतेच पण त्यांच्या विशाल,निरपेक्ष विचाराने हिंदू धर्मातील लोक देखील आदर करीत असे म्हणूनच हिंदू-मुस्लिम धर्मातील ज्येष्ठ पुढाऱ्यातील दुवा म्हणून मौलाना आझाद यांच्याकडे बघितल्या जात होते.खऱ्या अर्थाने हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हटल्यास वावगे वाटणार नाहीच.

आपल्या भारत देशांवर सर्वाधिक काळ मुस्लिम समाजातील लोकांचे वर्चस्व होते हे मान्य करावेच लागेल पण इंग्रजांची सत्ता भारतात आल्यानंतर मात्र 'राजा' असलेल्या लोकांना निमुटपणे छळ सहन करावा लागत होता.मुस्लिम धर्मातील महत्वपूर्ण व्यक्ती म्हणजे सर सय्यद अहमद यांच्या लेखांचा मौलाना आझाद यांच्या जीवनावर परिणाम पडला.प्रखर राष्ट्रवाद हा त्यांच्या जगण्यातला स्थायीभाव होता पण सर सय्यद अहमद यांनी इंग्रजांशी हात मिळविणी केली तरी आझाद मात्र स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर राहून राष्ट्रभक्तीची बीजे रोवली.इजिप्त,अरबस्तान, तुर्कस्तान, फ्रान्स इत्यादी देशात भेटी देऊन क्रांतिकारकांच्या संपर्कात राहू लागले.क्रांतिकारकांच्या संपर्कात असल्याने राजकीय मतात बदल होऊ लागला.भारतीय जनतेला होणारा त्रास,होणारा अन्याय दूर सारण्यासाठी जनजागृतीचा उचललेले पाऊल प्रेरणादायी ठरले.'अलहीलाल' हे कलकत्ता स्थित उर्दू साप्ताहिकातून ब्रिटिशाविरोधात आग ओखत असल्याने ब्रिटिशांनी त्यांच्यावर जामीन लावून वृत्तपत्रच बंद पाडले. स्वातंत्र्य चळवळ व इंग्रजांची जबरदस्ती त्यामुळे भारतीयांना प्रबोधनासाठी 'अल बलाघ' हे दुसरे वृत्तपत्र सुरू केले.'आझाद' या टोपण नावाने लेखन करणारे मौलाना यांना तुरुंगात कैद करण्यात आले आणि १०२० ला तुरुंगातून सोडण्यात आले.महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत त्यांनी उडी घेतली.पुन्हा त्यांना कैद करण्यात आले.जवळपास त्यांना एकूण ११ वर्ष कैदेत घालविण्यात आले.तुरुंगात असतांना अवघ्या पस्तीसाव्या वर्षी राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आलेले पाहिले तरुण अध्यक्ष म्हणून मौलाना अबुल कलाम आझाद होय.

मौलाना अबुल कलाम आझाद यांची कष्ट व निष्ठा यावर अपार श्रद्धा होती.अखंड हिंदुस्थान राहावा,फाळणी होऊ नये,मुस्लिमांनी वेगळ्या देशाची मागणी करू नये यासाठी राष्ट्रप्रेम,राष्ट्रभक्ती,अखंडता अबाधित राहण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्न केले.दुसरे महायुद्ध सुरू असतांना तर स्वातंत्र्य मिळेपर्यंत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविणारे अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून मौलाना आझाद यांच्याकडे बघितले जाते.१९४२ चा चले जाव आंदोलन,भारत छोडो आंदोलनात बजावलेली भूमिका महत्वपूर्ण आहे.'छोडो भारत' हे आंदोलन दडपण्यासाठी प्रमुख काँग्रेसच्या पुढाऱ्यांना अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यात डांबण्यात आले त्यात महात्मा गांधी,पंडित नेहरू,राजेंद्र प्रसाद,वल्लभभाई पटेल सह मौलाना



आझाद देखील होते.त्यावेळी मौलाना आझाद यांच्या पत्नीचे निधन झाले असल्याने त्यांना सुट्टी मिळणार होती आणि विनंतीपूर्वक अर्ज देण्यासाठी ब्रिटिशांनी कळविले परंतू मौलाना आझाद यांनी अर्ज देण्यास नकार दिला त्याक्षणी "इंग्रजांना सत्ताधारी मानत नाही तर त्यांना विनंती का करू"? असा उलटपक्षी उत्तर देण्यात आले.इतके स्वाभिमानी व निष्ठावंत शिपाई म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.क्रिप्स योजना (१९४२)वेव्हेलची सिमला परिषद (१९४५) याच काळात काँग्रेसचे अध्यक्षपद मौलाना आझाद यांच्याकडे होते.जगात जर्मनी व इटली या देशातील हुकूमशाहीने पुढे जगाला धोका असल्याचे सूतोवाच त्यांनी केले होते.दुसऱ्या महायुद्धात इंग्रजांची झालेली अपरिमित हानी,सत्ता बदल,भारतीयांचा स्वातंत्र्य लढा यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु अखंड हिंदुस्थानाचे दोन तुकडे होऊ घातलेले होते. मौलाना आझाद यांना देशाची फाळणी मान्य नव्हती.महात्मा गांधी यांच्याशी सल्लामसलत करून अखेर दोन स्वतंत्र देश निर्माण झाले तरी देखील मुस्लिमांना भारतात राहण्याचे आवाहन सातत्याने करीत राहणारे मौलाना आझाद हेच खरे हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हटल्यास वावगे वाटणार नाहीच.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात शिक्षण मंत्री पदी आरूढ झाले.राष्ट्रीय शैक्षणिक निरपेक्षपणे धोरण,मोफत शिक्षण,आधुनिक शास्त्रे व आधुनिक विचारांची पेरणी करणारे मौलाना आझाद होते. शिक्षणात प्राथमिक,माध्यमिक व उच्च शिक्षण पद्धतीत बदल घडविण्यासाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था,विद्यापीठ अनुदान आयोग ही त्यांच्या कल्पनेतील उच्च शिक्षणातील संस्था होत्या तसेच संगीत नाटक अकादमी,साहित्य अकादमी,ललित कला अकादमी या सर्वांची देण म्हणजे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून मरणोत्तर (१९९२) साली भारतरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.विविध वृत्तपत्रातून विविध भाषेत लिखाण करीत असले तरी कुराणाचा अभ्यास करून 'तरजूमानुल कुराण' हे पुस्तक लिहिले.'इंडिया विन्स फ्रीडम' हे मरणोत्तर आत्मचरित्र प्रकाशित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील त्यांची कामगिरी बघता केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २००८ पासून त्यांची जयंती "राष्ट्रीय शिक्षण दिन" म्हणून संपूर्ण देशात साजरी केल्या जाते.शिक्षणात कोणताही भेद न करता सर्वांना समान न्यायाची धोरणे अवलंबण्याची नीती सुकरतेने चालविली म्हणून त्यांच्याच नावाने हैद्राबादस्थित मौलाना आझाद मुक्त विद्यापीठ स्थापन करून शिक्षणाचे प्रवाही वारे आजही चालू आहे.हिंदू-मुस्लिम धर्मात भेद न करता एकच माणुसकी धर्मात तोलणारे व्यक्तिमत्व हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीकच होते असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.

# भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांचे शैक्षणिक विचार



सौ. अनुराधा कुलकर्णी
कल्याण, मुंबई

आधुनिक केसरी


**भारतात दरवर्षी 11 नोव्हेंबर हा दिवस शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. देशाचे पहिले केंद्रीय शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचा 11 नोव्हेंबर हा जन्मदिन आहे. 11 नोव्हेंबर 2008 पासून हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने घेतला. मौलांना आझाद यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान बहुमोल आहे. यासाठी त्यांना 1992 मध्ये सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान असलेला भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

मौलांना अबुल कलाम आझाद यांचा जन्म 11 नोव्हेंबर 1888 रोजी झाला. त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात देखील सहभाग घेतला होता. ते जन्मजातच अतिशय विद्वान व बुद्धिमान होते. बाराव्या वर्षी त्यांनी वाचनालय चालवले सोळाव्या वर्षी त्यांनी साप्ताहिक चालवले. स्वतंत्र भारताचे ते पहिले शिक्षण मंत्री होते. ब्रिटिशांच्या कारकिर्दीत शैक्षणिक धोरणाचे त्यांना उत्तम आकलन होते. साम्राज्यवादी ब्रिटिश शिक्षण प्रणाली पासून भारतीय शिक्षणाला वेगळे करून लोकशाहीच्या गतिमान अमलबजावणीसाठी शिक्षणाचा आग्रह धरला.

मौलाना आझाद यांच्या मते शिक्षण आणि राष्ट्रवादाचा  जवळचा संबंध असतो. शिक्षणाने संकुचित वृत्ती नष्ट होते. लोकशाहीत सामाजिक शिक्षण महत्त्वाचे असते. आर्थिक नियोजन पेक्षा शैक्षणिक नियोजन महत्त्वाचे असते. शिक्षणामुळे समाज व्यवस्थेत सत्प्रवृत्ती निर्माण होते. स्वतंत्र भारताच्या शिक्षण व्यवस्थेचा पाया घालण्यात आणि देशातील शिक्षणात अमुलाग्र सुधारणा करण्यात मौलाना अबुल कलाम आझाद यांनी दिलेल्या योगदानाची आठवण म्हणून त्यांच्या जन्मदिवस 11 नोव्हेंबर राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे.

भारताने लोकशाहीचा स्वीकार केल्यानंतर लोकशाहीच्या गतिमान अमलबजावणीसाठी शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी नितांत गरज होती. सामान्य जनता व गरीब जनता साक्षर झाल्याशिवाय लोकशाहीला भवितव्य नाही असे मौलाना आझाद कलाम यांचे मत होते. भारताचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून मौलांना आझाद यांनी धर्मनिरपेक्षक भूमिका घेऊन भारतीय नागरिक सुशिक्षित होणे कसे आवश्यक आहे हे प्रतिपादित केले .भारतीय नागरिकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा आग्रह त्यांनी धरला. भारतीय नागरिकत्वांची जाणीव शिक्षणाने होते म्हणून प्रौढसाक्षरता अभियान चालविण्यावर त्यांनी भर दिला. लोकशाहीचा पुरस्कार केल्यानंतर लोकांना मत म्हणजे काय, शासनाची जबाबदारी म्हणजे काय, हे माणसाला शिक्षणाने समजते याची जाणीव मौलांना आझाद यांनी देशाला करून दिली. शैक्षणिक बाबतीत त्यांनी पाच कलमी कार्यक्रम सांगितला. 1, )सर्व वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे शिक्षण .

2 )प्रौढ साक्षरता अभियाना ला गती .



3 )उच्च शिक्षणातील दर्जा वाढवण्यासाठी विविध सवलती. 4 )राष्ट्रीय गरजेप्रमाणे तांत्रिक. आणि वैज्ञानिक शिक्षणात वाढ घडून आणणे.

5 ) संस्कृतीत संपन्नतेसाठी विविध उपक्रम हाती घेणे.

भारताचे शैक्षणिक धोरण ठरविताना त्यांनी काही आदर्श डोळ्यासमोर ठेवले होते. उदारमतवादी आणि मानवतावादी शिक्षण देशाला प्रगती व संपन्नतेच्या मार्गावर नेते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आजाद यांनी शैक्षणिक क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला . त्यांनी विद्यापीठ अनुदान अर्थात यूजीसी ची स्थापना केली .आयआयटी संस्थाची स्थापन केली. अनेक शिक्षण संस्थांची स्थापना केली. नाट्य अकादमी, साहित्य अकादमी, ललित अकादमी, यांच्या कार्यकाळातच स्थापन झाली. शिक्षण क्षेत्रात त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे मौलांना आझाद यांच्या जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात येतो .आंतरराष्ट्रीय शांततेसाठी शिक्षणाला प्राधान्य  मानले. राष्ट्रीय एकात्मता यासाठी शिक्षणाची गरज आहे .भारत सरकारने संपूर्ण देशात शिक्षण अधिकार अभियान सुरू केले. राष्ट्रीय शिक्षण हा दिवस भारतातील वार्षिक उत्सव दिवस आहे. मौलाना आझाद प्रसिद्ध भारतीय कवी, लेखक ,पत्रकार व स्वतंत्रसेनानी होते .त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांना त्यांचा शैक्षणिक धोरणात होते. त्यांच्या कार्यकाळात 1948 चा उच्च शिक्षणासाठी डॉ. राधाकृष्णन आयोग स्थापन  करण्यात आला.1952 चा माध्यमिक शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला.त्यांच्या शैक्षणिक धोरणात महिला शिक्षण, व्यावसायिक शिक्षण प्रसार, कृषी शिक्षण विषयक प्रशिक्षण, 14 वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण मोफत व अनिवार्य शिक्षण याचा प्रामुख्याने उल्लेख होता.स्त्री शिक्षणाचे समर्थक म्हणून त्यांचे कडे पाहिले जाते. तसेच सामाजिक शिक्षणाची आवश्यक ते बाबत त्यांनी जाणीव करून दिली. शिक्षण प्रणालीमध्ये तीन भाषेचा विचार त्यांनी केला. इंग्लिश, हिंदी व संबंधित राज्यभाषा याचा समन्वय साधणे. शिक्षण हा माणसाचा मूलभूत हक्कापैकी एक आहे. राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त या हक्काची जाणीव सर्वांना व्हावी .शिक्षणानेच विकासाच्या संधीचे दार खुले होते तेव्हा त्या दिशेने पावली पडावी ही अपेक्षा. मौलाना आझाद  यांचे भारताच्या शैक्षणिक क्षेत्राच्या विकासातील योगदान सर्वासाठी निश्चित प्रेरणादायी आहे.या थोर शैक्षणिक विचारवंताला त्रिवार अभिवादन.

# नोकरीच्या मागे न लागता तरुणांनी व्यवसायाकडे वळावे

आधुनिक केसरी

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

आज दिवसेंदिवस बेरोजगारीचा प्रश्न वाढत चालला आहे.आज कित्येक तरूण सुशिक्षित बेरोजगार आहेत.अनेक  जण  केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देतात. परंतू  परीक्षार्थींची संख्या जास्त असल्याने सगळ्यांनाच  यश मिळेलच असे नाही.

आपण पाहतो सुशिक्षित बेरोजगारांना कायमस्वरूपी नोकरी नाही म्हणून अनेक जण नशिबाला दोष देत असतात.वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सरकार  कुणा कुणाला नोकर्या देणार हा खरा प्रश्न आहे. शंभर टक्के नोकर्या कोणालाच मिळु शकत नाही.त्यासाठी तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता  व्यवसायाकडे वळले पाहिजे.

तरुणांनी आपला कल ,क्षमता ,आवडी निवडी ओळखून आवडीच्या क्षेत्रात स्वताःला झोकुन दिले पाहिजे.केवळ सुरक्षित जिवनासाठी सरकारी नोकरीचे खुळ डोक्यातून काढून टाकले पाहिजे.आजच्या तरूणांमध्ये  बदल घडवून आणण्याची क्षमता आहे.परंतू त्यांना दिशा व योग्य कौशल्य उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

आज कित्येक तरूण नोकरीसाठी धडपड करत आहे.मात्र त्यांना व्यवसायातून करीअर करण्याची संधी आहे.यातून आपण मोठी प्रगती करु शकतो.व्यावसायिक दृष्टिकोन ठेवुन व्यवसायाला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.तरूणांनी व्यवसाय करण्यासाठी उज्ज्वल ध्येय  ठेवावे.संगणक क्षेत्रातील नवीन कौशल्ये आत्मसात करायला हवी.प्रत्येकात  जिद्द, कष्ट,करण्याची तयारी असली ना तर आपण कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो.

नाविण्यपुर्ण कल्पना यांचा उपयोग करून स्वतः ला व्यवसायात झोकून दिले पाहीजेत. कष्टाची तयारी आणि आत्मविश्वास असल्यास व्यवसायात निश्चित यश मिळवता येते.

बेरोजगारीवर मात करायची असेल तर व्यवसाय हा उत्तम पर्याय आहे.आपल्या स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात करीअर करून आपण स्वताःची  पुर्तता केली पाहिजे.व्यवसाय करायचा असेल तर व्यवस्थापन महत्वाचे आहे.ध्येय  निश्चित करुन त्यासाठी पुर्ण तयारी महत्वाची आहे.

व्यवसायात जिद्द व मेहनत महत्वाची आहे. नेहमी मोठा विचार करा.छोटी पावले उचला ध्येर्याने काम करा .स्वताःची वेगळी ओळख करा.वेगळ्या वाटेने गेलेल्या व्यक्तींनी इतिहास घडवला आहे.आपण जन्म कोणत्या  कुळात घेतला हे आपल्या हातात नाही.परंतू पुरुषार्थ घडवणे आपल्या हातात नक्कीच आहे.

कोणतेही काम कमी दर्जाचे नसते . प्रामाणिकपणे कष्ट करण्याची तयारी असल्यास आपणही उद्योग व्यवसाय करू शकतो.गरज आहे अंग झटकून काम करण्याची भले शुन्यातून सुरवात करा.खंबीरपणे प्रत्येक गोष्टीला सामोरे जा.लोक काय म्हणतील याकडे लक्ष देऊ नका.

धिरुभाई अंबानी , शंतनुराव किर्लोस्कर अशा महान उद्योगपतींनी छोट्या कामातुन सुरुवात केली होती.अनेक आव्हाने पेलत  त्यांनी यश संपादन केले.रात्रीच्या गर्भात उद्याचा उषःकाल असतो.हे लक्षात ठेवा.व्यवसाय उद्योग हे चढाओढीचे क्षेत्र आहे.यासाठी तुम्हाला पात्रता सिद्ध करावी लागते.धोका पत्करला पाहिजे.श्रम केले पाहिजे.यश मिळाले तरी डोकं शांत ठेवले पाहिजे.

आपण वेगवेगळ्या वाटा शोधायला  हव्या. धाडसाने चालायला शिकले पाहिजे.

ठेच लागली म्हणून आपण रस्ता बदलता कामा नये.आज ठेच लागेल पण उद्याचे भवितव्य उज्ज्वल आहे.हे लक्षात ठेवा.आज व्यवसायातुन करीअर करण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.कोण कीती  पुढे गेला यापेक्षा आपण मागे राहता कामा नये.स्वतामध्ये आत्मविश्वास निर्माण करून व्यवसायात उतरले पाहिजे.

आज व्यवसाया ऐवजी तरूणांचा नोकरीकडे कल वाढत आहे.त्यातुनच बेरोजगारी वाढताना दिसत आहे.वाढत्या बेरोजगारीवर मात करायची असेल तर तरुणांनी व्यवसायात उतरले  पाहिजे.त्यासाठी अथक प्रयत्न केले पाहिजेत. आज काळ बदलला आहे.आधुनिक युगाकडे जगाची वाटचाल चालू आहे.त्यासाठी आपण काळानुरूप बदलले पाहिजे.काळानुसार व्यवसायात बदल घडवून अत्याधुनिक व्यवसाय,उद्योग उभारले तर नक्कीच रोजगाराचा प्रश्न सुटेल.




# महावितरणच्या नाट्यस्पर्धेत जळगाव परिमंडळास उपविजेतेपद

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महावितरणच्या आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेत जळगाव परिमंडलाने सादर केलेल्या 'अर्यमा उवाच' या नाटकाने रसिकांची मने जिंकत उपविजेतेपद पटकावले.

महावितरणच्या कोकण प्रादेशिक कार्यालयातर्फे नुकतीच वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात नाट्य स्पर्धा पार पडली. स्पर्धेत सांघिक कार्यालयासह भांडूप, नाशिक, कोकण, कल्याण व जळगाव परिमंडलाने सहभाग घेतला. जळगाव परिमंडलातर्फे सोमनाथ नाईक यांनी लिहिलेल्या 'अर्यमा उवाच' या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. या नाटकास रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. या नाटकास स्पर्धेत उपविजेतेपद मिळाले.

या संघास मिळालेली पारितोषिके : सर्वोत्कृष्ट बालकलाकार (प्रथम) - पूर्वा जाधव, (द्वितीय) - समर्थ जाधव, रंगभूषा व वेशभूषा (प्रथम)- सागर सदावर्ते, संगीत (द्वितीय) - चेतन सोनार, प्रकाशयोजना (द्वितीय)- आशीष कासार, नेपथ्य (द्वितीय)- कमलेश भोळे, अभिनय (महिला) (प्रथम) - युगंधरा ओहोळ, अभिनय (पुरुष) (उत्तेजनार्थ) - शुभम सपकाळे, दिग्दर्शन (द्वितीय) - मयूर भंगाळे. या नाटकाची निर्मिती मुख्य अभियंता कैलास हुमणे यांची होती. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरुण शेलकर हे व्यवस्थापक होते. या नाटकात संकेत राऊत, भावेश पाटील, पूनम थोरवे, युगंधरा ओहोळ, शुभम सपकाळे, मयूर भंगाळे, योगेश लांबोळे, सागर सदावर्ते, रवीकुमार परदेशी, पायस सावळे, श्वेतांबरी पाटील, मानसी माने, पूर्वा जाधव, प्रणिता शिंपी, समर्थ जाधव, भूषण तेलंग, महेश कोळी, सत्चित जोशी, कमलेश भोळे, रवींद्र चौधरी, किशोर मराठे, उमेश गोसावी, अक्षय पाटील, चेतन नागरे, विशाल आंधळे यांनी भूमिका साकारल्या.

या यशाबद्दल मुख्य अभियंता कैलास हुमणे, सहायक महाव्यवस्थापक नेमीलाल राठोड, कार्यकारी अभियंता राजेंद्र मार्के यांनी सर्व कलावंतांचे अभिनंदन केले आहे.

# रवींद्र जडेजाच्या पत्नीला भाजपाचे तिकीट; गुजरात निवडणुकीतून राजकीय पदार्पण!

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सध्या देशात चर्चा आहे ती टी-२० क्रिकेट वर्ल्डकपची! या वर्ल्डकपमध्ये भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा दुखापतीमुळे खेळू शकला नाही. मात्र, असं असलं, तरी आता रवींद्र जडेजा दुसऱ्या एका कारणामुळे चर्चेत आला आहे. रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा हिला भाजपानं गुजरात विधानसभा निवडणुकीत तिकीट दिलं आहे. त्यामुळे रिवाबा जडेजा या निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय विश्वात पदार्पण करणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. विशेष म्हणजे भाजपानं विद्यमान आमदाराला टाळून रिवाबाला निवडणुकीचं तिकीट दिल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा हिला भाजपा तिकीट देणार असल्याची चर्चा गेल्या दोन दिवसांपासून सुरू होती. अखेर ही चर्चा खरी ठरली असून आज रिवाबाच्या तिकिटाची घोषणा भाजपाकडून करण्यात आली आहे. आगामी निवडणुकीत जामनगर उत्तर या मतदारसंघातून रिवाबा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. त्यामुळे साहजिकच पत्नीसाठी खुद्द रवींद्र जडेजाही भाजपाचा प्रचार करताना आगामी काळात दिसण्याची शक्यता आहे. जामनगर उत्तर हा भाजपाचा हक्काचा मतदारसंघ राहिला आहे. धर्मेंद्रसिंह जडेजा हे सध्या जामनगर उत्तर या मतदारसंघातून भाजपाचे आमदार आहेत. मात्र, विद्यमान आमदारांना नाकारून भाजपानं नवख्या रिवाबा जडेजा यांच्यावर भरवसा दाखवला आहे. त्यामुळे स्थानिक वर्तुळात भाजपा पदाधिकाऱ्यांच्या नाराजीचीही चर्चा रंगली आहे.





# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ग्रामीण सेवादल जिल्हाध्यक्षपदी मारुती दारकू साळवे


आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते, अजित दादा पवार यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष, जयंत पाटील साहेब यांच्या सूचनेने औरंगाबाद जिल्हा ग्रामीण जिल्हाअध्यक्ष, कैलास पाटील यांच्या शिफारशीने महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाचे प्रदेश अध्यक्ष, डॉ. जानबा म्हस्के यांनी मारुती दारकू साळवे यांची औरंगाबाद जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाच्या ग्रामीण जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. तरी त्यांच्या निवडीचे स्वागत मराठवाडा पदवीधर संघाचे आमदार, सतिष भाऊ चव्हाण व शिक्षक आमदार, विक्रम काळे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब सावंत, जिल्हासमन्वयक रविभाऊ माहोरकर, डॉ. ज्ञानेश्वर निळ, अनिल चव्हाण, गणेश पवार, अशोकजी थोरात, विजय वरकड, रावसाहेब तोगे व जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ नेत्यानी निवडीचे स्वागत केले आहे.

# मालदीवमध्ये घरांना आग; १० जणांचा मृत्यू; नऊ भारतीयांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मालदीवची राजधानी माले येथे गुरुवारी विदेशी कामगारांच्या घरांना लागलेल्या भीषण आगीत १० जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अनेकजण जखमी झाले आहेत. मृत्यू झालेल्यांमध्ये नऊ भारतीयांचाही समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे. मालदीवमधील भारतीय उच्चयुक्त कार्यालयाकडूनही याबाबतचे एक ट्वीट करण्यात आले असून त्यांनी मदतीसाठी फोन नंबरही दिले आहेत. दरम्यान, आगीचे कारण अद्यापही अस्पष्ट आहे. ज्या ठिकाणी ही आग लागली ते एक अपमार्केट हॉलिडे डेस्टिनेशन म्हणून ओळखले जाते. हे जगातील सर्वात दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणांपैकी एक



आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या आगीत नुकसान झालेल्या इमारतींतून १० मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. यापैकी नऊ भारतीय तर एक बांगलादेशी नागरिक आहे. ही आग इतकी भीषण होती, की ती आटोक्यात आणण्यासाठी जवळपास चार तासांचा अवधी लागाला.



# सिडको कार्यालय नाशिकमध्येच सुरू ठेवण्याचा निर्णय

## हरकत दाखला, मिळकत हस्तांतरणासाठी औरंगाबादला जायची गरज नाही

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सिडको प्रशासन कार्यालय बंद करण्याच्या निर्णयाच्या विरोधात राजकीय पक्ष व नागरिकांनी केलेले आंदोलनाने निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता राज्य शासनाने अखेर सिडको कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.
सिडकोच्या नवी मुंबई येथील व्यवस्थापकीय संचालक यांना पत्र पाठवून आवश्यक कर्मचारी ठेवून कार्यालय सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत, त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.
नाशिक येथील सिडकोचे कार्यालय बंद करण्याचे आदेश शासनाने दिले होते. यामुळे नागरिकांना ना हरकत दाखला, मिळकत हस्तांतरण, यासारखी महत्वाची आणि लहान-मोठी कामे करण्यासाठी सामान्य नागरिकांना औरंगाबाद येथे फेऱ्या माराव्या लागणार होत्या. या पार्श्वभूमीवर अनेक पक्ष संघटनाकडून या निर्णयास विरोध करण्यात येत होता. शिवाय नागरिकांची घरे फ्री होल्ड करून द्यावी, त्यानंतरच कार्यालय बंदच निर्णय घ्यावा अशी मागणी जोर धरू लागली होती. यासाठी शिवसेनेने देखील या निर्णयास विरोध केला होता. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सिडको प्रशासनाचा विरोधात जन आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा दिला होता. या सर्वांच्या मागणीला अखेर यश आले आहे.
सिडकोतील सहा गृहनिर्माण संस्थांच्या हस्तांतरण महापालिकेकडे झाल्याने आता कोणत्याही प्रकारचे काम शिल्लक नसल्याने सिडकोचे नाशिकमधील कार्यालय बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र त्यानंतर अनेक स्तरावरून विरोध करण्यात




आला. सिडकोतील घरांच्या हस्तांतर करताना परवानगी लागते. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटले नाहीत. त्यामुळे कार्यालय बंद करण्यास विरोध होत होता. शिवसेनेसह अनेक पक्षांच्या प्रमुखांनी त्यास विरोध करत असताना बाळासाहेबांची शिवसेनेचे महानगर प्रमुख प्रवीण यांनी देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले होते. त्यानंतर त्यांनीही फेरविचार करून प्रसंगी कार्यालय सुनील ठेवण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर शासनाने कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिक येथील कार्यालयात आवश्यक तेवढे कर्मचारी ठेवण्याचे सांगून इतर अधिकारी कर्मचारी विशेषत तांत्रिक संवर्ग यांना आवश्यकतेनुसार इतरत्र पदस्थापना देण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. सिडको ने भाडेपट्ट्यांनी दिलेल्या जमिनी होल्ड ते फ्री होल्ड करण्याच्या कारवाई अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे आता काम करण्यासाठी आवश्यक असणारा कमीत कमी कर्मचारी वर्ग नाशिक कार्यालयात कायम ठेवावा. त्याचबरोबरव इतर कर्मचाऱ्यांना इतरत्र पदस्थापना देण्यात यावी असेही आदेशात म्हटले आहे.

### औरंगाबादला हलविणार होते कार्यालय

नाशिकमध्ये सिडकोची स्थापना ही शहराचे नियोजन करुन ते विकसित करण्याच्या उद्देशाने 1970 साली करण्यात आली होती . नाशिक सिडकोच्या कार्यक्षेत्रातील सेवा सुविधा पूर्ण केल्यांनतर त्याचे हस्तांतरण नाशिक महानगरपालिकेकडे करण्यात आले असल्याने सिडको कार्यालय बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता . घर हस्तांतरणाचे अधिकार सिडकोने स्वत :कडे ठेवलेले असल्याने उत्पन्नाचा मार्ग सुरू राहिल्याने हे कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते . दरम्यान काही दिवसांपूर्वी राज्य शासनाने आदेश देत हे कार्यालय औरंगाबाद येथे हलविण्याचे आदेश दिले होते . मात्र राहिलेल्या नागरिकांना घरे मिळेपर्यंत हे कार्यालय नाशिकमध्येच राहणार असल्याचे समजते .



# कृषी विभागाकडून रब्बी हंगामात बीज प्रक्रिया मोहिमेचा प्रचार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात सध्या रब्बी हंगाम पेरणी चालू झाली आहे रब्बी हंगामात शेतकरी ज्वारी हरभरा गहू मका या पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी करतात पेरणी चालू असताना कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली बहुलखेडा, कवली ,नांदगाव ,तिडका परिसरात पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशक, जमिनीतील व हवेतील अन्नद्रव्य स्थिरीकरण करणारे जिवाणू हे बियाण्याला प्रति किलो 4 ग्रॅम याप्रमाणे हलक्या हाताने चोळून बियाणे सावलीत सुकवून नंतर पेरणी करावी बीज प्रक्रिया केल्याने जमिनीतून पिकांच्या मुळावर येणारी बुरशी थांबते त्यामुळे मुळ्यांचा जमिनीत विकास होऊन अन्नद्रव्ये चांगल्या प्रकारे घेऊ शकतात. परिणामी पिक जोमाने वाढते एकंदरीत उत्पादनात दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढ होण्यास मदत होते अशी माहिती कृषी सहाय्यक सतीश बोरसे व सचिन पाटील यांनी दिली व शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले.

# विरोधी पक्षाच्या नेत्यांचा आवाज दाबण्याकरिता केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर

## ठरवून तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजप विरोधी पक्षाच्या नेत्यांचा आवाज दाबण्याकरीता केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करत असून विरोधकांना ठरवून तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न केला जात असल्याची शंका देशातील जनतेच्या मनात असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी व्यक्त केले.
कोर्टाने खासदार संजय राऊत यांचा पत्राचाळीशी काहीही संबंध नाही तरी त्यांना गोवण्यात आले. नेत्यांना ठरवून टार्गेट करण्याचा प्रयत्न झाला. ईडी कारवाई झपाट्याने करते मात्र तपासात दिरंगाई करते. माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार व माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची नावे टाकण्यात आली जेणेकरून त्यांच्या मनात भीती निर्माण व्हावी अशी चार महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. त्यामुळे राजकीय नेत्यांच्या मनात भय निर्माण करण्यासाठी ही नावे टाकली का असा सवालही कोर्टाने केला असल्याचे महेश तपासे म्हणाले.
गुजरातमध्ये भाजपच्या आमदाराला एका केसमध्ये गुजरात हायकोर्टाने विरोधात निकाल दिला असताना त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे तर दुसरीकडे महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या नेत्यांना टार्गेट केले जात आहे याकडेही महेश तपासे यांनी लक्ष वेधले आहे.
त्यामुळे केंद्रीय यंत्रणाचा दुरुपयोग विरोधी पक्षाच्या नेत्यांचा आवाज दडपण्यासाठी भाजप करत आहे का? याचे उत्तर द्यावे अशी मागणीही महेश तपासे यांनी केली आहे.

# गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा; नजरकैदेत ठेवण्याची मागणी मान्य

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील आरोपी गौतम नवलखा यांना एक महिन्यासाठी घरात नजरकैदेत ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. नवलखा यांना नजरकैदेत ठेवण्यात येणाऱ्या परिसराची नीट तपासणी करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना न्यायालयाने दिले आहेत. येत्या ४८ तासांमध्ये या आदेशाचे पालन करण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. नजरकैदेदरम्यान घराच्या आवारात पोलीस कर्मचाऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या संरक्षणासाठी दोन लाख चार हजार रुपये भरण्यासही न्यायालयाने नवलखा यांना सांगितले आहे. नवलखा सध्या तळोजा तुरुंगात कैदेत आहेत. आरोग्याच्या समस्या भेडसावत असल्यानं घरात नजरकैदेत ठेवण्यात यावं, अशी मागणी त्यांनी याचिकेद्वारे केली होती. या याचिकेला 'एनआयए'ने विरोध दर्शवला होता. नवलखा काश्मिरी कट्टरतावाद्यांसह पाकिस्तानी गुप्तचर संस्था 'आयएसआय'च्या संपर्कात असल्याचा आरोप 'एनआयए'ने केला होता. न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान 'एनआयए'ने नवलखा यांच्या खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय अहवालावर संशय व्यक्त केला होता. या रुग्णालयातील डॉक्टर नवलखा यांच्या परिचयाचे असल्याचा 'एनआयए'चा



आरोप होता. त्यानंतर नवलखा यांची पुन्हा वैद्यकीय चाचणी करण्यात आली होती. नजरकैदेदरम्यान मोबाईल, इंटरनेट, लॅपटॉप किंवा संभाषणाची इतर उपकरणं वापरण्यास नवलखा यांना मज्जाव करण्यात आला आहे. सेवेत असलेल्या पोलिसांनी उपलब्ध केलेला फोन दिवसातून केवळ एकदा १० मिनिटांसाठी वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. घराच्या परिसरात येणाऱ्या त्यांच्या साथीदारांनाही इंटरनेट वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. "नवलखा यांचं वय आणि आजार लक्षात घेता त्यांना घरात नजरकैदेत ठेवणं आम्ही योग्य मानतो", असे न्यायालयाने म्हटले आहे. ७० वर्षीय नवलखा यांना त्वचेच्या एलर्जीसह दातांच्या समस्येनं ग्रासलं आहे.

# भंगार व्यवहाराच्या वादातून हवेत गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** भंगार साहित्य व्यवहारात दलालीच्या वादातून सराईत गुन्हेगाराने हवेत गोळीबार केल्याची घटना सातपूर-अंबड लिंक रस्त्यावर घडली. यावेळी हवेत दोन फैरी झाडण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. अंबड-लिंक रस्त्यावरील रिलायबल वजन काट्यासमोर बुधवारी रात्री ही घटना घडली. भंगार साहित्य व्यवहाराच्या दलालीवरून सोहेल चौधरी व मुन्ना चौधरी यांच्यात बाचाबाची झाली. वाद सोडविण्यासाठी शब्बीर चौधरी तिथे गेला. तेव्हा गुलाम हुसेन शेख हा साथीदारांसह त्या ठिकाणी आला व त्याने शब्बीरला शिवीगाळ केली. हा वाद उपस्थितांनी मिटवला. मात्र नंतर दीड तासाने आसिफ शेख, अली शेख व मुन्ना शेख हे मोटारीतून उपरोक्त ठिकाणी आले. वाहनातून उतरून आसिफ शेखने हवेत गोळीबार केला. यावेळी संशयिताने हवेत दोन फैरी झाडल्याची प्राथमिक माहिती आहे.

# गिरीश महाजनांनी जळगाव शहराचे पाच वर्षांत वाटोळे केले

## शहर विकासासाठी शंभर-दोनशे कोटी रुपये देण्याच्या फक्त वल्गना ; राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** शहराचे गेल्या पाच वर्षांत गिरीश महाजनांनी वाटोळे केले आहे. महाजनांनी शहर विकासासाठी शंभर-दोनशे कोटी रुपये देण्याच्या फक्त वल्गना केल्या आहेत. प्रत्यक्षात मात्र निधी आला नाही आणि जो आला त्यातही मोठा भ्रष्टाचार झाला आहे. यामुळे आज जळगाव हे शहर नसून एखादे खेडे झालेय. गेल्या पन्नास वर्षांत जळगावची इतकी कधी दुर्दशा झाली नसून, ती आज झालीय. यासाठी कारणीभूत महाजन हे आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांनी केली. दूध संघ निवडणुकीसाठी आमची पूर्ण तयारी झाल्याचेही सांगत, खासदार संजय राऊत यांच्या सुटकेचा शिवसेनेलाच नव्हे, तर महाविकास आघाडीलाही फायदा होईल, असे खडसे म्हणाले. शहरातील निवासस्थानी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



महापालिकेची आज निवडणूक झाली तर गिरीश महाजन आणि आमदार राजूमामा भोळे यांचा एकही सहकारी निवडून येणार नसल्याचा दावा आमदार खडसेंनी केला. जळगाव शहराचे या पाच वर्षांत महाजनांनी वाटोळे करून टाकलेय. गिरीश महाजनांनी सांगितले होते, मी तुम्हाला शंभर कोटी देतो, दोनशे कोटी देतो, मला मतदान करा, नाहीतर एक मत मागायला मी येणार नाही, असे गिरीश महाजनांचे शब्द होते आणि ज्या अर्थाने महाजनांनी, सुंदर शहर, स्वच्छ शहर, चांगले शहर बनवू, नाहीतर तुम्हाला तोंड दाखवणार नाही, अशा स्वरूपाचे शब्द वापरले होते. मात्र, त्याच्या उलट जळगाव शहराची अवस्था झालेली आहे. रस्त्यांमधले खड्डे पाहिले, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पाहिली, गटार पाहिल्या, मच्छर पाहिले, तर मला वाटते जळगाव शहर राहिले नाही, तर त्याला खेड्याचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसतेय. याला सर्वच जबाबदार आहेत. भाजपची सत्ता होती. भाजपने यात घोळ केला. भ्रष्टाचार केला, अशा तक्रारी आहेत. पाणीपुरवठा योजनांमधील निविदांमध्ये मोठा घोटाळा झालाय, गटार योजनांमध्ये मोठा घोटाळा झालाय, कचरा साफसफाईच्या निविदांमध्ये घोटाळा झालाय, प्रत्येक गोष्टीमध्ये भ्रष्टाचार, इतक्या खोलवर जळगाव शहरात गेला, त्याचा परिणाम विकासकामांवर झाला. त्यामुळे आता जनता नाराज आहे. आता निवडणुका झाल्या तर आमदारांचा एकही सहकारी नगरसेवका निवडून येणार नाही, अशी स्थिती आहे. लोकांच्या मनात संताप आहे. मी जळगावमध्ये राहतो, आजूबाजूला फिरतो, आता मला वाटतं अशी अवस्था जळगाव शहरातली गेल्या पन्नास वर्षांत कधीच नव्हती. महाजनांनी शहर विकासासाठी मोठा निधी देण्याच्या वल्गना केल्या, प्रत्यक्षात मात्र जळगावची अतिशय खराब अवस्था झाली आहे, असा घणाघातही त्यांनी केला.

# कृषिमंत्री अब्दुल सत्तार म्हणतात मी 'सुरक्षित'



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यानंतर कृषिमंत्री अब्दुल सत्तार हे चांगलेच अडचणीत सापडले आहे. राज्यभरातून होत असलेल्या टिकेनंतर सत्तार यांनी दिलगिरी व्यक्त करत माफी देखील मागितली आहे. मात्र विरोधकांकडून अब्दुल सत्तार यांच्या राजीनाम्याची सतत मागणी केली जात आहे. त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच, आता राजीनाम्याच्या मुद्यावरून खुद्द सत्तार यांनीच सूचक विधान केले आहे. मी 'सुरक्षीत' असल्याचे सूचक वक्तव्य सत्तार यांनी केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्तार यांचा राजीनामा घेण्याचे टाळले असावेत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. औरंगाबादच्या विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला अब्दुल सत्तार यांनी आज हजेरी लावली. यावेळी त्यांनी पीक विमा संबधित आढावा घेतला. तर पीक विमा कंपन्याचे अधिकारी देखील या बैठकीत हजर होते. दरम्यान बैठक संपल्यावर सत्तार यांनी माध्यमांशी संवाद साधला. तर सुप्रिया सुळे यांच्याबद्दल केलेल्या विधानावरून राजीनामा देण्याची मागणी केली जात असल्याचा प्रश्नाला उत्तर देणे सत्तार यांनी टाळले. मात्र याचवेळी बोलताना 'मी सुरक्षीत, मी सुरक्षीत' असे सूचक वक्तव्य सत्तार यांनी केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे सत्तार यांचा राजीनामा घेणार नसल्याची चर्चा पाहायला मिळू लागली आहे.

## एसटीत ऑनलाइन पेमेंट कधी ? मशीनच मिळेनात...!

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** एसटीचा प्रवास सुलभ व्हावा अन् प्रवाशांना ऑनलाइन पेमेंट करता यावे, यासाठी महामंडळ अँड्रॉइड मशीन उपलब्ध करून देणार होते; मात्र अद्याप या मशीन मिळाल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांसह वाहकांनाही या मशीनची प्रतीक्षा लागली आहे.एसटीचा प्रवास करताना सुट्ट्या पैशांसाठी वाहक व प्रवासी यांच्यात नेहमीच वाद होतात. याचा परिणाम कधी कधी हाणामारीपर्यंत जातो. त्यामुळे ही समस्या सोडविण्याच्या उद्देशाने, एसटी महामंडळाने अँड्रॉइड मशीन देण्याचे नियोजन केले आहे. या मशीनमुळे प्रवाशांना तिकिटाची रक्कम थेट ऑनलाइन देता येते. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या मशीन उपलब्ध झाल्या असल्या तरी औरंगाबाद जिल्ह्यात मात्र अद्यापही या उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे जुनी समस्या कायम आहे. प्रवाशांना सुटे पैसे घेऊनच प्रवास करावा लागत आहे. "राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या मशीन आल्या आहेत. त्याचा प्रत्यक्ष वापर सुरू झाला नसून, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. औरंगाबाद जिल्ह्यात अद्याप मशीन उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे अजून




काहीकाळ या मशीनची वाट बघावी लागेल. सध्याच्या डिजिटल युगात सर्वच ठिकाणी ऑनलाइन पेमेंटची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे एसटीत नव्याने उपलब्ध होणाऱ्या या मशीनद्वारे कार्ड पेमेंट करता येणार आहे. जिल्ह्याला मशीन उपलब्ध झाल्या नसल्याने सध्यातरी कार्ड पेमेंट, गुगल पे, फोन पे यासारख्या डिजिटलचा वापर प्रवाशांना करता येत नाही. एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांना सवलत जाहीर केली आहे. त्यांच्यासाठी मोफत प्रवास असला तरी त्यांना शून्य रकमेचे तिकीट देण्यात येत असून त्यावर अमृत महोत्सव ज्येष्ठ नागरिक सवलत असे लिहिलेले असते.

## राजपूत-परदेशी समाजाविरुद्धच्या कुरापती थांबवा : धोंडीराम राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** या देशाचे मूळ रहिवाशी आदिवासी जनजातीचे नागरीक व  राजपूत /परदेशी समाजाचे नागरिक आहेत, राजपूत/परदेशी भटके समुदायात मोडतात, तत्कालीन समयी एका गावाहून दुसऱ्या गावी जाणे व उदर निर्वाह करणे,ही त्यांची जीवन पध्दती होती. हे मूळचे जरी राजस्थान चे असले, तरी भटकत, स्थलांतर करीत हे सर्व देशभर विखुरलेले आहेत. या भटकंतीमुळे ते शिक्षण पासून कालही दूर होते व आजही दूर आहेत त्यांना शिक्षणाचा गंध ही  नव्हता,मात्र प्रखर राष्ट्रनिष्ठ, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम त्यांच्या ठायी -ठायी होते जे आजही त्याच्या रक्तात टिकून आहे, कृतीतव कर्मात टिकून आहे, देशाच्या मातीशी एकनिष्ठ असणारा हा समाज आजही अत्यंत मागास आहे, या समुदायातील मुलांनी /मुलींनी शिकावे, उच्च शिक्षण घ्यावे व आपल्या कुटुंबाची, आपल्या समाजाची उन्नती साधावी या साठी महाराष्ट्र सरकारने त्यांना विमुक्त जातीत समाविष्ट केलेले आहे, यामुळे आज या समाजाची मुले-मुली शिकत आहेत,उच्च पदावर देशाची सेवा करीत आहेत, या देशाच्या मातीची व भारतमातेची मनोभावे सेवा करीत आहेत, हे काही विघातक, स्वार्थी व आपमतलबी राजकारण्यांना



पाहवत नाही,या समाजाची उन्नती व विकास पाहवत नाही, तसेच हे काही राजकारणी मंडळींच्या व काही विघ्नसंतोषीच्या डोळ्यात खुपत आहे, म्हणून ते सारखे सरकारला या राजपूत/परदेशी समाजाला सोयी-सवलती नको म्हणून खाजवत असतात त्यांनी जाणून घ्यावे की या देशाचे मूळ रहिवासी हे राजपूत/परदेशी आहेत या देशाच्या प्रत्येक बाबींवर त्यांचा आधी अधिकार आहे. त्यांनी या देशाच्या मातीशी एकनिष्ठ राखलेली आहे. या माताशी नाळ प्रथम त्यांची आहे. त्यांच्या विरोधात काड्या करणे म्हणजे या देशाशी या देशाच्या मातीशी बेईमानी करणे होय त्यांनी या काड्या करणे थांबविले नाही तर समाज अन्याय, जुलम विरुद्ध पुन्हा पेटुन उठेल, शासनाने हि अशा विघ्नसंतोषी व विघातक वृत्ती च्या लोकांना त्वरित आवरायला हवे अशी विनंती धोंडीराम ध राजपूत, वैजापूर जिल्हा औरंगाबाद मो.9421312244 यांनी सरकारला केली आहे.

## मोलखेडा हिवरी परिसरातील कापूस वेचण्यासाठी मजूर मिळेना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा, हिवरी येथे मजूर शोधण्यासाठी आसपासच्या परिसरातील शेती गावात शेतकऱ्यांना चकरा माराव्या शिवारात सध्या कापूस मोठ्या प्रमाणावर फुटला आहे.बाहेरगावाहून मजूर मात्र कापुस आणून कापसाची वेचणीचा प्रयत्न करावे लागत आहे. वेचणीला मजूर मिळत नसल्याने मजूर शोधण्यासाठी शेतकऱ्यांची अडचण वाढली आहे. परतीच्या पावसाने शेतीचे मोठे नुकसान झाले, याचा फटका मक्का, सोयाबीन सह कापूस पिकालाही बसला आहे. सध्या सगळीकडे कापूस फुटला असून, शेतशिवार पांढरे दिसत आहे. नाचनवेल परिसरात जास्तीची मजुरी देऊनही कापूस वेचणीसाठी मजूर मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे दररोज सकाळी मजुरांसाठी वाहनाची व्यवस्था करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. वाहन कसे आहे, त्यात किती मजूर बसवणार, बसायला नीटनेटकी जागा आहे का आदी प्रश्नांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, परिसरात कपाशीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. त्यामुळे पहिल्या ते दुसऱ्या वेचणीत कापूस संपुष्टात येणार असून, उत्पन्नात मोठी घट होणार आहे, असे शेतकरी ज्ञानेश्वर रामभाऊ वारंगणे सरपंच मोलखेडा ता सोयगाव यांनी बोलताना सांगितले.



## आदिवासी विद्यार्थ्यांची मेट्रोतून सहल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यातील आदिवासी दुर्गम भागातील सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी मेट्रोमधून प्रवासाचा आनंद लुटला. कस्तुरचंद पार्क, खापरी आणि झिरो माईल आणि फ्रीडम पार्कला भेट दिली. महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडाराआदी जिल्ह्यातील एकल विद्यालयातील इयत्ता चौथी ते सातवीच्या विद्यार्थी नागपूर मध्ये सहलीसाठी आले होते. त्यांनी  मेट्रोच्या प्रवासाचा आनंद घेतला. प्रवासादरम्यान, खडीमार गावाची रहिवासी असलेल्या एकल विद्यालयातील इयत्ता ६ वी ची विद्यार्थिनी समिक्षा खलाल हिचा १२ वा वाढदिवस धावत्या गाडीत उत्साहात साजरा करण्यात आला. माझ्यासाठी सर्वात मोठा आनंदाचा दिवस आहे,अशी प्रतिक्रिया समीक्षाने दिली. कस्तुरचंद पार्कपासून मुलांनी मेट्रोचा प्रवास सुरू झाला मेट्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रवासादरम्यान मुलांना मेट्रोशी संबंधित माहिती दिली. आपण पहिल्यांदाच मेट्रो गाडी बघितली आणि यात प्रवास करून आपल्याला मजा आल्याचे एकल विद्यालय परतवाडा येथील इयत्ता चौथीचा विद्यार्थी कुणाल कासदेकर आणि आलापल्ली विद्यालयाची विद्यार्थिनी समिक्षा खेकरे यांनी सांगितले.

## नादांतांडा येथील वरदानसिंग चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ब्लँकेट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदातांडा येथील  वरदानसिंग ठाकुरसिंग चव्हाण ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांनी बुलढाणा येथे द लव ट्रस्ट अनाथ आश्रम बुलढाणा येथे अनाथ मुलांना जीवनावश्यक वस्तुंची किट वाटप करण्यात आली आणि वरदानसिंग चव्हाण यांनी या अनाथ मुलांना थंडीपासून बचाव होण्यासाठी उबदार कपडे, ब्लँकेट अशा वस्तू  वाटप करण्यात आले वाढदिवसाच्या निमीत्ताने हा सामाजिक बांधलकीचा कार्यक्रम वाढदिवसाच्या निमित्ताने  राबविण्यात येतो त्याच प्रमाणे यंदा त्यांनी अनाथ मुलांना जीवन आवश्यक वस्तूची किट याप्रसंगी वाटप केली. नांदातांडा या परीसरामधे वरदानसिंग चव्हाण यांचे नेहमी सामाजिक काम कार्य चांगले अग्रेसर असतात त्यांनी असे ठरविले वाढदिवसा वरती जास्त खर्च नकरता वाढदिवस अगदि साध्या पद्धतीने साजरा करुन हाच पैसा काही नविन कार्यक्रम राबवुन गोरगरीब आणि अनाथ मुलांना गरजू जीवनावश्यक वस्तूंची वाटप करुन साजरा करावा असे वरदानसिंग चव्हाण यांनी ठरविले आणि हा उपक्रम वाढदिवसा निमीत्ताने राबविला भेट वस्तु कार्यक्रमादरम्यान बुलढाणा द लव ट्रस्ट अनाथ आश्रम चे कर्मचारी पदाधीकारी आणि सोबत पंडीत चव्हाण, आत्माराम चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, मनोज चव्हाण व मान्यवर  यावेळेस उपस्थित होते अशी माहिती वरदानसिंग चव्हाण यांनी दिली.




काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in